cmyk

## संपादकीय

### सरकारची मनमानी!

देशात यापुढे दरवर्षी २५ जून हा 'संविधान हत्या दिन' म्हणून पाळण्यात येईल अशी घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केली. याच दिवशी १९७५ साली तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू केली होती. आणीबाणीच्या काळात ज्यांनी अमानवी यातना भोगल्या त्यांच्या योगदानाचे स्मरण करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे गृहमंत्री अमित शहा यांनी १२ जुलै रोजी जाहीर केले. 'संविधान हत्या दिवसा'चे पालन केल्याने प्रत्येक भारतीयामध्ये वैयक्तिक स्वातंत्र्याची अखंड ज्योत तेवत राहील आणि लोकशाहीचे संरक्षण जिवंत राहील असा दावा शहा यांनी केला.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–९० रविवार दि.२१ जुलै २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने– ६ किंमत ३ रूपये


### विदर्भात मुसळधार पावसाचा तडाखा

नागपूर : हवामान विभागाच्या अंदाजानुसार गेल्या २४ तासात विशेषत: पूर्व विदर्भातील सर्व जिल्ह्यात मुसळधार पावसाने जोरदार तडाखा दिला. सर्वत्र, सर्वदूर संततधार पावसाने हजेरी लावल्याने नदी, नाले ओसंडून वाहत आहेत. चंद्रपूर जिल्ह्यात दोन तरुण नाल्याच्या पुरात वाहून गेले. गडचिरोली जिल्ह्यात २७ रस्ते पाण्याखाली असून भामरागडसह शेकडो गावाचा संपर्क तुटला. नागपूर शहरात पहाटेपासून ६ तासांत २१७ मि.मी. पाऊस झाला असून शेकडो वस्त्या जलमय झाल्या. भंडारा, वर्धा, गोंदिया या जिल्ह्यांनाही मुसळधार पावसाचा तडाखा बसला असून गोसीखुर्दसह सर्व प्रमुख धरणांचे दरवाजे उघडण्यात आले आहेत.

# चिंताजनक: महाराष्ट्रातील धरणांमध्ये ३६ टक्के पाणीसाठा

## सर्वाधिक कमी पाणीसाठा मराठवाड्यात; पावसाळा सुरु होऊन महिना लोटला तरी मोठ्या पावसाची प्रतिक्षा



संभाजीनगर । प्रतिनिधी

राज्यात सध्या ठिकठिकाणी पाऊस होत असून धरणांमधील पाणीपातळी वाढत आहे. काही धरणांमधून विसर्ग करण्यात येत असून अनेक धरणांना मोठ्या पावसाची प्रतीक्षा असल्याचे दिसून येत आहे. पावसाळा सुरु होऊन महिना लोटला तरी महाराष्ट्रातील धरणांमध्ये अवघे ३६ टक्के पाणीसाठा असल्याने गेल्या वर्षी सारखा यंदाही दुष्काळ तर पडणार नाही ना? या प्रश्नाने शेतकरी चिंताग्रस्त आहेत. राज्यामध्ये सर्वाधिक कमी पाणीसाठा हा मराठवाड्यात आहे. त्यामुळे या दुष्काळी भागावर यंदाही वरुणराजाने अवकृपा केल्याचे सध्या तरी दिसते.

जलसंपदा विभागाने दिलेल्या अहवालानुसार, राज्यातील एकूण धरणांमध्ये आता ३६.०७ टक्के उपयुक्त धरणसाठा आहे. यात छत्रपती संभाजीनगर विभागात केवळ १५.२६ टक्के पाणीसाठा शिल्लक असून राज्यातील इतर विभागांच्या तुलनेत हा सर्वात कमी धरणसाठा आहे. कोकणात सुरु असलेले मुसळधार पान २ वर

### नाशिक विभागात काय स्थिती?

*नाशिक विभागात सध्या २७.८६ टक्के पाणीसाठा असून मागील वर्षी हा पाणीसाठा ३९.१० टक्के एवढा होता. नाशिक विभागातील बहुतांश धरणांमध्ये पाणीसाठ्यात वाढ होत असून सर्वाधिक धरणे असणाऱ्या या विभागातील धरण परिसरात जोरदार पाऊस झाल्याने पाणीसाठा वाढत असल्याचे दिसून येत आहे. यात दारणा– ४९.९५, गंगापूर– ३३.६७, भंडारदरा– ४४.९०, मूळा– २१.६९, गिरणा– ६१.४८, हतनूर– ३३.८०, वाघुर– ६३.२८ असा पाणीसाठा आहे.*

### पुणे विभागातील धरणे किती भरली?

*पुण्यात मागील काही दिवसांपासून होत असलेल्या पावसामुळे धरणसाठ्यात चांगली वाढ झाली असून बहुतांश धरणांमधला पाणीसाठा आता वाढत आहे. कोल्हापूर, सांगली, साताऱ्यातील प्रमुख धरणेही आता ५० टक्क्यांच्या वर पोहोचली असून वारणा ६०.५३, राधानगरी ७०.५९ तर कोयना ४५.५८ टक्क्यांवर आहे. डिंभे– २४.४९, पानशेत– ५१.३७, खडकवासला– ७०.२४, पवना ३९.२७, चाकसमान– २५.७९, नीरा देवघर ३४.१२ असा पाणीसाठा आहे.*

### मराठवाड्याला मोठ्या पावसाची प्रतीक्षाच

*मराठवाड्यात हलक्या ते मध्यम सरींचा पाऊस होत असल्याने धरणांमध्ये हळूहळु पाणीसाठ्यात वाढ होत आहे. जायकवाडीचा पाणीसाठा अजूनही ५ टक्क्यांच्या ना पाणीटंचाईच्या झळा बसण्याची शक्यता आहे. जायकवाडी– ४.१३, निम्न दुधना– ६.२७, पूर्णा येलदरी– ३०.०९, माजलगाव – ०, मांजरा– ०, ऊर्ध्व पैनगंगा– ३९.५५, तेरणा– २३.४५ असा कमी पाणीसाठा आहे. मोठा पाऊस झाला नाही तर शेतकऱ्यांसाठी मोठी चिंतेची बाब आहे.*

# जगाला पुन्हा टेन्शन! करोनाची नवीन लाट

## या देशात हाहाकार, रुग्णांची संख्या वाढतेय



नवी दिल्ली । वृतसंस्था

दोन वर्षांपूर्वी संपूर्ण जगभरात करोनाने धुमाकुळ घातला होता. लोकांच्या मनातून करोनाचे भय निघून गेले आहे. मात्र, आता पुन्हा एकदा करोनाने डोकं वर काढले आहे. जपानमध्ये पुन्हा एकदा करोनाच्या रुग्णसंख्येत वाढ होत असल्याचे समोर आले आहे. आरोग्य विभागानेही इशारा देत म्हटलं आहे की, जपानमध्ये एक नवीन आणि अत्याधिक धोकादायक असा करोनाव्हायरसचा व्हेरियंटचा प्रसार झाला आहे. ज्यामुळे देशात कोविडची लाट पसरू शकते, असा इशारा आरोग्य विभागाने दिला आहे.

जपान संक्रमित रोग संस्थेचे अध्य काजुहिरो टेटेडा यांनी दिलेल्या माहितीनुसार, जपानमध्ये केपी. ३ व्हेरियंटचा फैलाव होत आहे. इतंकच नव्हे तर ज्या लोकांनी करोनाची लस घेतली आहे किंवा आधी झालल्या संक्रमणातूनही ते ठीक झाले आहेत. त्यांनाही करोनाच्या या पान २ वर

# राज्यात ४१ दिवसांनी आचारसंहिता लागू होणार

## उद्धव ठाकरेंचे भाकीत; विधानसभेचे रणशिंग फुंकत भगवा सप्ताहाची घोषणा



मुंबई । प्रतिनिधी

**लोकसभा निवडणुकांच्या निकालानंतर आता विधानसभा निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली आहे. ४१ दिवसांनी आचारसंहिता लागू होणार असल्याचे भाकीत उध्दव ठाकरे यांनी केले. तसेच त्यांनी विधानसभा निवडणुकीचे रणशिंग फुंकत भगवा सप्ताहाची घोषणा केली. त्यामुळे निवडणूक अवघ्या काही दिवसावर आली असल्याचे संकेत आहेत.**

नुकतेच राज्यातील महायुती सरकारचे यंदाच्या कार्यकाळातील शेवटचे अधिवेशन पार पडले. त्यामध्ये, विविध घोषणा करत सर्वसामान्य जनतेला आपल्याकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न राज्य सरकारने केला आहे. त्यात, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू करुन महिलांना दरमहा १५०० रुपये देण्याचा निर्णय झाला असून त्याची अंमलबजावणीही सुरू झाली आहे. त्यावरुन, विरोधक सत्ताधाऱ्यांना लक्ष्य करत आहेत. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आजही या योजनांवरुन सरकारला लक्ष्य केलं. त्यानंतर, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची सेनाभवन येथे उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत विधानसभा संपर्कप्रमुखांची बैठक पार पडली. या बैठकीतून उद्धव ठाकरेंनी विधानसभेचं रणशिंगच फुंकले आहे.

भाजपने विधानसभा निवडणुकांसह आगामी स्थानिक पान २ वर

### उध्दव ठाकरेंच्या संपर्कप्रमुखांना सुचना

*शिवसेना ठाकरे गटाकडून ४ ऑगस्ट ते ११ ऑगस्टपर्यंत भगवा सप्ताहाचे आयोजन करण्याचेही विधानसभा संपर्कप्रमुखांना सांगण्यात आले आहे. या भगवा सप्ताहमध्ये विधानसभा क्षेत्राचा आढावा घेऊन त्याची माहिती सेनाभवन येथे सादर करायची आहे. त्यामध्ये विविध कार्यक्रम आढावा बैठका घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुढील ४ महिन्यात पंधरा दिवसातून दोन दिवस विधानसभा क्षेत्रात संपर्कप्रमुखांनी स्वतः उपस्थितीत राहून आढावा घेण्याचे आवाहनही उद्धव ठाकरे यांनी संपर्कप्रमुखांना केले आहे.*

### जम्मू काश्मीरमध्ये रातोरात जादा लष्कर तैनात

जम्मू: देशातील वाढत्या दहशतवादी कारवायांचे हे सावट गडद होत असल्याचे पाहता केंद्र सरकारने काही कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. केंद्रीय सुरक्षा यंत्रणा आणि लष्कराने रातोरात संपूर्ण मोर्चा देशाच्या अतीव उत्तरेकडे असणाऱ्या या भागाच्या दिशेने वळवला असून, इथं सध्याच्या घडीला तब्बल लष्कराच्या ३००० जवानांचा अतिरिक्त फौजफाटा तैनात केला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शुक्रवारी घेतलेल्या उच्चस्तरिय बैठकीनंतर जम्मू काश्मीरमध्ये ही सूत्र हलण्यास सुरुवात झाली आणि रातोरात लष्कराची मोठी कुमक इथं पान २ वर

# अहिल्यानगर नामांतरास चॅलेंज; हायकोर्टात याचिका दाखल सुनावणीची तारीख पडली, राज्य सरकारची डोकेदुखी वाढली

अहमदनगर । प्रतिनिधी

**औरंगाबादचे छत्रपती संभाजीनगर आणि उस्मानाबादचे धाराशिव असे नामांतर केल्यावर राज्य सरकारने अहमदनगरचे अहिल्यानगर असे नामांतर करण्याचा निर्णय घेतला होता. आता मात्र अहिल्यानगर नामांतरास आव्हान देण्यात आले असून उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. सुनावणीची तारीख पडली असून राज्य सरकारची त्यामुळे डोकेदुखी वाढणार आहे.**

औरंगाबाद शहराचं नामांतर छत्रपती संभाजीनगर आणि उस्मानाबादे धाराशिव नामांतर केल्यानंतर राज्यातील महायुती सरकारने अहमदनगर शहराचेही नामांतार अहिल्यानगर करण्यात येणार असल्याचे जाहीर केले होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चौंडी येथील कार्यक्रमातूनच याबाबतची घोषणा केली होती. त्यानंतर, राज्य सरकारने यासंदर्भातील निर्णयही घेतला. १३ मार्च रोजी मंत्रिमंडळाच्या बैठकीत अहिल्यानगर नामांतरास मान्यताही देण्यात आली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. मात्र, याप्रकरणी आता सरकारची डोकेदुखी आणखी वाढल्याचे पान २ वर



### नामांतरास केंद्राची मंजुरी आवश्यक

*राज्य सरकारने मंत्रिमंडळात अहिल्यानगर नावाच्या प्रस्तावाला मान्यता दिली असून सध्या हे प्रकरण केंद्र सरकारच्या मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे. दरम्यान राज्य सरकारच्या या निर्णयाविरोधात आता जनहित याचिका दाखल करण्यात आल्याने याबाबत न्यायालय काय निर्णय घेणार याकडे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. तर, सरकारची डोकेदु:खी या निर्णयामुळे वाढली आहे.*

# ना रांगा, ना वेटिंग... विधानसभेला होणार सुपरफास्ट व्होटींग!

## निवडणूक आयोगाकडून विशेष आदेश; लोकसभा निवडणुकीतील रांगांनंतर घेतला मोठा निर्णय

मुंबई । प्रतिनिधी

**लोकसभा निवडणुकीत मतदानादरम्यान मुंबईतसहीत अनेक शहारांमध्ये मतदारांच्या लांबच लांब रांगा पाहयला मिळाल्या. यामधूनच आता निवडणूक आयोगाने धडा घेऊन नवीन धोरणं अवलंबले आहे. त्यामुळे ना रांगा, ना वेटिंग ... विधानसभेला सुपरफास्ट व्होटिंग होणार आहे.**



निवडणूक आयोगाकडून मान्यता प्राप्त झालेल्या राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची बैठक मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीमध्ये केंद्रीय निवडणूक आयोगाने केलेल्या सूचनांबद्दलची माहिती राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना देण्यात आली. लोकसभेच्या निवडणुकीच्या मतदानादरम्यान मुंबईमध्ये अनेक ठिकाणी गोंधळ उडाल्याचे चित्र पाहायला मिळाले. अनेक मतदान केंद्रांवर मतदारांच्या लांबच लांब रांगा दिसून आल्या. एकाच मतदान केंद्रावर मतदारांची संख्या वाढल्याने हा गोंधळ झाल्याने आता केंद्रीय निवडणूक आयोगाने आगामी विधानसभा निडवणुकीच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाचा निर्णय घेतला असून तशापद्धतीच्या सूचना राज्य निवडणूक आयोगाला केल्या आहेत. राजकीय पक्षांनी मुंबईमध्ये लोकसभा मतदानाच्या पान २ वर

### मतदान केंद्रांची विभागणी

केंद्रीय निवडणूक आयोगाच्या सल्ल्याप्रमाणे एका मतदान केंद्रावर जास्तीत जास्त १५०० मतदान ठेवण्याच्या सूचनेचा संदर्भ देत अधिक मतदार असलेल्या मतदान केंद्रांची विभागणी करुन नवीन मतदान केंद्र तयार करण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. यामुळे नागरिकांना मतदानासाठी अधिक वेळ वाट पाहवी लागणार नाही आणि प्रक्रिया जलदगतीने पार पडेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२० जुलै २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ६.०० क्विंटल | २,३०० | ३,३०० | २,७०५ |
| ज्वारी/हायब्रिड : ६९.५० क्विंटल | २,००१ | २,७१० | २,३२२ |
| मूग : १.०० क्विंटल | १,९५० | ३,०४१ | २,४५५ |
| तूर : ३.५० क्विंटल | ५,००० | १०,४५० | ७,७२५ |
| उडीद : ०.५० क्विंटल | ४,००१ | ४,००१ | ४,००१ |
| बाजरी: २८.५० क्विंटल | २,३०० | ३,५०० | २,६६५ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: ६२.५० क्विंटल | ४,४६० | ४,४६० | ४,४६० |
| हरभरा: २.०० क्विंटल | ५,४०० | ६,३०१ | ५,८५० |

# लाडकी बहीण योजनेसाठी आत्तापर्यंत ७२ लाख अर्ज

## महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांची माहिती; विरोधकांनाही सुनावले





मुंबई । प्रतिनिधी

**राज्यात सध्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेबाबत विरोधकांकडून टीका केली जात असताना या टीकेला महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी बारामतीतून उत्तर दिले आहे. लाडकी बहीण योजनेसाठी आतापर्यंत ७२ लाखांपेक्षा जास्त अर्ज करण्यात असल्याचे सांगत या योजनेचा फॉर्म भरण्यासाठी येणाऱ्या अडचणी, सर्वर डाऊनची अडचण, महिलांकडून फॉर्म भरून घेताना घेतले जाणारे पैसे, यावरून विरोधकांकडून टीका केली जात आहे. या टीकेला मंत्री अदिती तटकरे यांनी जोरदार उत्तर दिले आहे.**

यावेळी अदिती तटकरे म्हणाल्या, लाडकी बहीण योजनेसाठी रोज ८ ते १० लाख अर्ज येत असून आत्तापर्यंत ७२ लाखांपेक्षा जास्त अर्जांची नोंदणी झाली आहे, असे सांगत अदिती तटकरे यांनी विरोधकांवर जोरदार प्रत्यूत्तर दिले आहे. त्या म्हणाल्या, विरोधक पहिला दिवसांपासूनच या योजनेसंदर्भात टीका करत आहेत. मात्र मला आवर्जून सांगायचे आहे की, या पान २ वर

### मनोज जरांगे यांची लाडकी बहिण योजनेवर टिका



*लाडकी बहिण योजना आताच आणायची होती का? त्याच्यामुळे आम्हाला कास्ट सर्टिफिकेट निघत नाहीये. आमची खूप परवड लागली आहे, आम्हाला टाईम पण मिळत नाही, दहा दिवसात कसं सर्टिफिकेट मिळायचं, पावतीवर रजिस्ट्रेशन करायला सांगत आहेत, आम्हाला पावती पण भेटत नाही, असे म्हणत मराठा विद्यार्थीनीने मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्यासमोर टाहो फोडला. त्यावर मनोज जरांगे यांनी लाडकी बहिण योजनेवर जोरदार टिका केली. १५०० रुपये घेऊन आम्हाला आमच्या आयुष्याला पुरणार आहेत का? असा सवाल त्यांनी यावेळी केला. कोणतच आरक्षण द्यायचे नाही, उलट लाडकी बहिण, लाडका भाऊ, आता लाडकी मेहुणी–लाडका मेहुणा योजना आणतील, अशी सरकारवर त्यांनी टिका केली.*

cmyk

cmyk



## अग्रलेख

# सरकारची मनमानी!

देशात यापुढे दरवर्षी २५ जून हा 'संविधान हत्या दिन' म्हणून पाळण्यात येईल अशी घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केली. याच दिवशी १९७५ साली तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू केली होती. आणीबाणीच्या काळात ज्यांनी अमानवी यातना भोगल्या त्यांच्या योगदानाचे स्मरण करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे गृहमंत्री अमित शहा यांनी १२ जुलै रोजी जाहीर केले. 'संविधान हत्या दिवसा'चे पालन केल्याने प्रत्येक भारतीयामध्ये वैयक्तिक स्वातंत्र्याची अखंड ज्योत तेवत राहील आणि लोकशाहीचे संरक्षण जिवंत राहील असा दावा शहा यांनी केला.

त्यामुळे काँग्रेससारख्या हुकूमशाही शक्तींना त्या भयानक कृत्याची पुनरावृत्ती करण्यापासून रोखता येईल अशी टीकाही त्यांनी केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या निर्णयाचे समर्थन केले. राज्यघटना पायदळी तुडवण्यात आली तेव्हा काय झाले याचे संविधान हत्या दिवस हे स्मरण आहे तर आणीबाणीच्या अतिरेकामुळे त्रास सहन केलेल्या प्रत्येक व्यक्तीला आदरांजली वाहण्याचा हा दिवस आहे असे ते म्हणाले. आणीबाणी हा देशाच्या इतिहासातील काळा दिवस होता. इंदिरा गांधी यांनी लोकशाहीची हत्या केली, असे भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी म्हटले आहे. काँग्रेसच्या या हुकूमशाही मानसिकतेविरुद्ध ज्यांनी लढा दिला, घटनेच्या रक्षणासाठी आणि लोकशाही पुनर्स्थापित करण्यासाठी ज्यांनी त्याग करून हौतात्म्य पत्करले, त्याचे हा दिवस आपल्याला स्मरण करून देईल,असेही नड्डा म्हणाले.

केंद्र सरकारने २५ जून हा 'संविधान हत्या दिन' म्हणून पाळण्याचे जाहीर केल्यानंतर त्याला काँग्रेसने प्रत्युत्तर देताना म्हटले की, ढोंगीपणाने आकर्षक मथळे मिळवण्याचा हा पंतप्रधान मोदींचा प्रयत्न आहे. देशात ८ नोव्हेंबर २०१६ रोजी 'नोटबंदी' जाहीर करण्यात आली. त्यामुळे जनता यापुढे तो दिवस 'आजीविका हत्या दिन' म्हणून पाळेल तसेच ४ जून रोजी लोकसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाले तो दिवस इतिहासात 'मोदी मुक्ती दिन' म्हणून ओळखला जाईल. सर्वांत जास्त आणीबाणी ही मोदींच्या काळात आहे. मोदींनी कोणाशीही चर्चा न करता तीन गुन्हेगारी कायदे लागू केले. अशा प्रकारचे अनेक घातक निर्णय मोदी सरकारने घेतले आहेत. त्यामुळे मोदींच्या काळात आणीबाणीसारखीच परिस्थिती आहे अशी टीका पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केली. २५ जून हा 'संविधान हत्या दिन' म्हणून पाळण्याचा निर्णय केंद्र सरकारने जाहीर केला. यावर काँग्रेससह अन्य विरोधी पक्षांनी सडकून टीका केली. गत लोकसभा निवडणुकीत भाजपची पीछेहाट झाल्याने आपण संविधानाच्या विरोधात नाही हे सांगण्यासाठी अशा प्रकारचा निर्णय जाहीर करण्यात आला असावा.

७ राज्यांतील १३ विधानसभा पोटनिवडणुकांमध्ये भाजपविरोधी कल दिसून आला. याचा अर्थ भाजप उत्तरेतही पीछेहाट सुरू झाली आहे. आता भाजपची मदार महाराष्ट्रावर आहे. कारण लवकरच महाराष्ट्र, हरियाणा, झारखंड व जम्मू-काश्मीरमध्ये विधानसभांच्या निवडणुका होणार आहेत. राज्यातील २९ हजार कोटींच्या प्रकल्पांची उद्घाटने हा त्याचाच एक भाग होता. आणीबाणी लागू झाल्याच्या घटनेला ५० वर्षांचा कालावधी लोटल्यानंतर त्या जखमेची खपली काढण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न केले जात आहेत. आणीबाणी ही संविधानाच्या कलम ३५२ अन्वये लागू करण्यात आली होती. त्याचा अर्थ ते अनुशासन पर्व असल्याने देशाला शिस्त लावण्यासाठी अशा प्रकारची कठोर पावले उचलणे आवश्यक असल्याची भूमिका त्यामागे होती. या भूमिकेचे संघाने व बाळासाहेब ठाकरे यांनी जाहीर समर्थन केले होते. परंतु जनतेला ते आवडले नाही. जनतेने इंदिरा गांधी व काँग्रेसला योग्य तो धडा शिकवला. नंतर इंदिरा गांधींनी जनतेची जाहीर माफी मागितली तेव्हा याच जनतेने त्यांना मोठ्या मताधिक्याने सत्तेवरही आणले.

त्यानंतर वाजपेयी व पुन्हा काँग्रेसची सत्ता आली पण कोणालाच आणीबाणीची अडचण झाली नाही. गत दहा वर्षांत मात्र पुन्हा एकदा ती अडचण भासू लागली आहे असे दिसते! गत दहा वर्षांत न्याय संस्था, केंद्रीय तपास यंत्रणा व निवडणूक आयोग यावर नियंत्रण मिळवून सत्ताधा-यांनी त्यांचा गैरवापर केल्याच्या असंख्य घटना सांगता येतील. विरोधकांना तुरुंगात डांबणे, भ्रष्टाचा-यांना अभय देणे, वृत्तपत्रे व पत्रकारांवर निर्बंध घालणे ही एक प्रकारे अघोषित आणीबाणीच नव्हे काय? गत दहा वर्षांतील सरकारचा प्रत्येक दिवस हा संविधान हत्या दिन आहे. संविधान बदलाचे संकेत मिळाल्याने लोकसभा निवडणुकीत जनतेने भाजपला नाकारले हे वास्तव आहे. आता तेच लोक खोटेनाटे बोलून आपली मलिन झालेली प्रतिमा उजळून काढण्यासाठी सारवासारव करीत आहेत. जगातील सर्वोत्तम 'संविधान' देशाला मिळाले आहे. या संविधानाच्या आधारेच जगातील सर्वांत मोठी लोकशाही असलेला देश म्हणून भारत ओळखला जातो आणि आजही लोकशाही टिकून आहे ती संविधानावरच. देशाचे 'संविधान' हा लोकशाहीचा आत्मा आहे.

कालमानानुसार देशहितासाठी, जनहितासाठी त्यात अनेक बदल केले गेले, होत आहेत आणि होत राहतील. मात्र गेल्या काही वर्षांपासून काहीजण संविधान बदलण्याची भाषा करीत आहेत पण संविधानाच्या मूळ तत्त्वांना कोणताही धक्का लावता येणार नाही. केंद्र सरकारने २५ जून १९७५ हा दिवस 'संविधान हत्या दिवस' म्हणून पाळण्याची अधिसूचना जारी केली आहे. म्हणजे १९७५ नंतर हा देश मृत संविधानावर चालत आहे काय? तसे असेल तर आजवरची सरकारे कोणाची शपथ घेऊन सत्तेवर आले? मोदी सरकारही दहा वर्षांपासून कुठल्या आधारावर चालत आहे? संविधान हा वाद घालण्याचा विषय नाही. भारतीय संविधान जेवढे लवचिक आहे तेवढेच ताठरही आहे. ते सहजासहजी बदलणे शक्य नाही. त्यामुळे दहा वर्षांत घटनाबा कृत्ये करून संविधानाची रोजच हत्या करणे ही एकप्रकारे अघोषित आणीबाणीच आहे! मूल्ये, तत्त्वे व नैतिकतेला भारतात जास्त महत्त्व आहे मात्र ते जपले जात नाही ही खंत आहे.

# गुरु हा धैर्याचा डोंगरु । कदाकाळी डळमळेना ।।

**विस्तीर्ण, विशालकाय पसरलेल्या पर्वतावरील एकाकी पडलेल्या पाषाणाला एक शिल्पकार आपल्या छन्नी-हातोडा आणि अलौकिक कल्पकतेच्या सहाय्याने मूर्तीचे रूप देऊन मंदिरात केवळ पूजा करण्यायोग्य बनवत नाही, तर त्या दगडामध्ये लाखो ज्ञानी-प्रज्ञावंत माणसांना त्यांच्या जागृत श्रद्धा आणि यशासाठी सजीव प्रतिक निर्माण करतो! हाच खरा गुरु! हेच गुरुचं खरं गुरुत्वाकर्षण! गुरुचं गुरुत्वाकर्षण हे पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणापेक्षाही जास्त प्रवाही, जे जीवनातील कण-कण आणि क्षण-क्षण व्यापून टाकतं! यामुळेच कि काय, कुणी कितीही महान-प्रतिभावंत-श्रीमंत-गुणवंत आणि कोणत्याही पदांवर विराजमान असला तरी क्षणार्धात गुरूंच्या चरणी नतमस्तक होतो ! गुरु नेमकं आपल्या शिष्याला काय देतो बरं ? हा मोठा कळीचा प्रश्न आहे. याचं उत्तर म्हणजे, गुरु शिष्याला काहीच देत नसून केवळ शिष्यातील लघुतत्व संपवतो आणि त्यालाच गुरुस्थानी विराजमान करतो! तोच खरा गुरु! गुरु म्हणजे कुणी कानात फुंकणारा, बंदिस्त करून लोकांना गुह्य ज्ञान सांगणारा नसून 'गुह्य लोकांती प्रकट करणारा'च खरा गुरु होय! गुरु म्हणजे परीसापेक्षाही श्रेष्ठ! परीस केवळ लोखंडाचं सोनं करतो, परीस नाही करू शकत; परंतु गुरु आपल्या शिष्याला गुरुत्व प्रदान करून आपल्या बरोबरीचं स्थान देतो! म्हणजेच गुरु सोनं नाही तर दुसरा परीसच तयार करून आपल्या शिष्यालाच गुरु करतो!**

गुरु म्हणजे सच्चा वाटाड्या! गुरु आपल्या विद्यार्थ्यांना निरपेक्ष, स्वच्छ आणि प्रांजळ भावनेने मार्गदर्शन करून त्यांना योग्य मार्गावर चालण्याचा उपदेश करतो. माणसाला जन्मापासून ते आत्तापर्यंत अनेक गुरु भेटत आलेत. त्यातील प्रथम गुरु म्हणजेच आई-वडील, कुटुंब आणि भोवतालचे वातावरण! खऱ्या अर्थाने माणसाची जडणघडण ही त्याच्या परिवारातच होत असते. तिथेच त्याला सुसंस्काराचे बाळकडू मिळते. कुटुंबातीलच व्यक्ती कसा श्रेष्ठ गुरु असू शकतो? याचे सर्वश्रेष्ठ उदाहरण म्हणजे संत ज्ञानेश्वर आणि त्यांचे मोठे बंधू संत निवृत्तीनाथ ! संत ज्ञानेश्वर 'ज्ञानेश्वरी'चा प्रारंभ

**देवा तूंचि गणेशु । सकलार्थमतिप्रकाशु ।**
**म्हणे निवृत्तिदासु । अवधारिजो जी ।।२।।**

या ओव्यांनी करतांना ओमकार, श्री वेद, स्वसंवाद, श्री गणेश आणि जेष्ठ बंधू श्री निवृत्तीनाथ यांना वंदन करूनच पुढे लेखन करतात. म्हणूनचआपले आई-बाबा-दादा-ताई आणि इतर नातेवाईक हेच आपल्याला बोट धरून उभं राहण्यापासून ते कुणाशी कसे बोलावे, कसे वागावे, काय खावे, काय खावू नये, इतकेच काय कोणता बूट कोणत्या पायात घालायचा इथपर्यंत शिकवत असतात. म्हणून महात्मा संत कबीरजी गुरूविषयी

गुरु कुम्हार शिष कुंभ है,गढि गढि काढ़ै खोट।अंतर हाथ सहार दै,बाहर बाहैचोट।।

हा दोहा लिहून गुरु शिष्यावर कसे मूलगामी संस्कार करत असतो (?) याचे सुंदर उदाहरण देतात. गुरु म्हणजे कुंभार, जो मडके घडवतांना आतून आधार देऊन बाहेरून थापत असतो, त्याप्रमाणे गुरु आपल्या शिष्यांना घडवत असतात.म्हणूनच अनेकांनी गुरूलाच आपल्या जीवनात अनन्यसाधारण महत्व देऊन त्यांनाच ईश्वर मानले आहे !

जीवनातील गुरुचे स्थान आणि गुरुस्पर्शामुळे होणारे अमुलाग्र बदल सर्वांनाच सर्वकाळ सुखावून जातात ! गुरूंचा कृपाकटाक्ष किती महत्वाचा आहे (?) याचे अनेकविध दृष्टांत आणि त्यानुषंगाने सिद्धांत आपल्यासमोर येतांना दिसतात. वारकरी संप्रदायाचे मुकुटमणी श्री संत नामदेव महाराजांना गुरूच्या उपदेशाने जीवनात नवा सूर्योदय झाला, अहंकाराची काळीकुट्ट रात्र संपून नवविचार उगवले ! एवढेच नाही तर

**आला शीतळ शांतीचा वारा । तेणें सुख झालें या शरिरा । फिटला पातकांचा थारा ।**
**कळीकाळासी धाक दरारा गा।।**

एवढे अमुलाग्र बदल झाल्याची साक्ष ते स्वतःच देतात. माणसाच्या जीवनाला चिरशांती आणि सुखप्राप्ती बरोबरच कळीकाळावर देखील विजय मिळविण्याचे सामर्थ्य गुरुस्पर्शाने माणसामध्ये निर्माण होते. देवा पासून ते दानवापर्यंत प्रत्येकाला गुरूची नितांत गरज असून, त्याच्या आगमनाने प्रत्यक्ष

**देव तयाचा अंकिला ।**
**स्वयें संचरा त्याचे घरा।।**

असा दाखला संत एकनाथ महाराज आपल्या अभंगातून देतात. याच अनुषंगाने संत तुकोबांना सुद्धा गुरूचा स्वप्नात उपदेश झाला आणि त्यानंतर त्यांचे जीवन मूलतः बदलून गेले.

**बाबाजी आपुले सांगितले**
**नाम। मंत्रदिला रामकृष्णहरी।।**

असे एक ना अनंत अभंग-वचने गुरु आणि त्याच्या मार्गदर्शनाबद्दल आढळून येतात. यापुढे जाऊन संत ज्ञानेश्वर आपल्या गुरुप्रती कृतज्ञता व्यक्त करतांना लिहितात, गुरु हा सुखाचा सागरूगुरु हा प्रेमाचा आगरुगुरु हा धैर्याचा डोंगरुकदाकाळी डळमळीना ही अद्भुत शक्ती केवळ केवळ गुरूच्या स्पर्शाने आणि अस्तित्वाने प्राप्त होते याचं अनुभूतीपूर्ण चित्रण माउली या अभंगातून करतांना दिसतात. म्हणूनच कोणताही कार्यक्रम असो, सर्वप्रथम

**गुरुर्ब्रह्मा ग्रुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः। गुरुः साक्षात्? परं ब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः।।**

हा श्लोक म्हटला जातो आणि कार्याला आरंभ केला जातो. गुरु एवढा श्रेष्ठ आणि त्याचे स्थान का महत्वाचे आहे ? कारण

**विद्वत्त्वं दक्षता शीलं सङ्कान्तिरनुशीलनम्?**
**।**
**शिक्षकस्य गुणाः सप्त सचेतस्त्वं प्रसन्नता ।।**

गुरु विद्वत्ता, दक्षता, शिल, सद्गुण, प्रसन्नता इत्यादी गुणांनी ओतप्रोत भरलेला असल्या कारणाने गुरुच माणसाचे संपूर्ण जीवन परिवर्तीत करू शकतो. त्यामुळेच ज्ञानेश्वरीमध्ये संत ज्ञानेश्वर सोपा दृष्टांत देतात,

**म्हणोनी जाणतेने गुरु भजिजे।**
**तेणे कृतकार्या होईजे।।**
**जैसे मूळ सिंचने सहिजे।**
**शाखा पल्लव संतोषिती।।**

झाडाला बहर येवून ते झाड फळा-फुलांनी जर भरगच्च सजून जायचे असेल तर त्याच्या मुळाशी पाणी घालावे लागते, त्याच न्यायाने जाणत्या लोकांनी गुरूंना वंदन करून स्वतःच्या जीवनाचे उद्यान फुलवून टाकावे !झाडाला बहर येवून ते झाड फळा-फुलांनी जर भरगच्च सजून जायचे असेल तर त्याच्या मुळाशी पाणी घालावे लागते, त्याच न्यायाने जाणत्या लोकांनी गुरूंना वंदन करून स्वतःच्या जीवनाचे उद्यान फुलवून टाकावे !

मित्रहो, आज काळ बदलला असून आपण तंत्रज्ञानाच्या युगात असलो तरी गुरूच्या मार्गदर्शनाशिवाय पर्याय नाही! आभासी पद्धतीने युट्युब, गुगल मिट, झूम आणि अन्य साधनांच्या आधारे शिकविण्याचा कितीही प्रयत्न करत असलो तरी प्रत्यक्ष वर्गात उपस्थित राहून ज्ञान गृहन केल्याशिवाय ते गळी उतरत नाही. विद्यार्थ्यांना शिस्त, आपुलकी, जिव्हाळा, प्रेम, वात्सल्य याचा अनुभव घ्यायचा असेल तर गुरुच्या मार्गदर्शनाला काहींही पर्याय नाही. हे आत्ताच संपूर्ण जगाने चांगले अनुभवले आहे. त्यामुळेच तर तमाम पालक वर्ग शाळा पुन्हा सुरु करण्याची मागणी करत होता. तेंव्हा जीवनात कितीठी बदल होऊ द्या, गुरुला पर्याय नाहीच ! त्याचबरोबर अन्य बाबी सुद्धा आपल्या गुरुस्थानी आहेत. जसे कि; गुगल, विकिपिडीया, आणि अन्य साधने सुद्धा गुरूची महत्वपूर्ण भूमिका निभावतांना दिसतात. तेंव्हा, चला आपल्या आई-वडिलापासून ते बाबा गुगल पर्यंतच्या सर्वच गुरुप्रती आज गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने कृतज्ञता व्यक्त करूया आणि सर्वच गुरूंच्या चरणी नतमस्तक होऊया

**! जय गुरुदेव !**

**प्रा.डॉ.विठ्ठल खंडूजी जायभाये**
कै.रमेश वरपूडकर महाविद्यालय,सोनपेठ
जि.परभणी(महाराष्ट्र),मो.९१५८०६४०६८

# अंबाजोगाई साहित्य संमेलन निमित्ताने व्यक्तिचित्रण लेखन स्पर्धेचे आयोजन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**११ व्या नियोजित अंबाजोगाई साहित्य संमेलन निमित्ताने ''व्यक्तिचित्रण लेखन स्पर्धेचे'' आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेत नवोदित आणि प्रथितयश लेखकांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग घ्यावे असे आवाहन स्वागताध्यक्ष सुदर्शन रापतवार आणि संयोजिका रेखा देशमुख यांनी केले आहे.**

या संदर्भात प्रसिध्दीस देण्यात आलेल्या पत्रकात पुढे असे म्हटले आहे की, नियोजित ११ व्या अंबाजोगाई साहित्य संमेलनाची तयारी सुरू झाली आहे. या संमेलनाच्या तयारीचा एक भाग म्हणून वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यातील ही ''व्यक्तीचित्र लेखन'' स्पर्धा आहे. माणूस समजून घेणे व त्याची ओळख इतरांना करून देण्यासाठी शब्दबद्ध करणे, हे मोठ्या कौशल्याचे काम असते. ते या स्पर्धेतून साधायचे आहे. ही स्पर्धा फक्त अंबाजोगाई करायसाठी आहे. या निमित्ताने आम्ही अंबाजोगाई शहरातील नवोदित आणि प्रथितयश लेखकांनी या स्पर्धेत भाग घ्यावा असे आवाहन स्वागताध्यक्ष सुदर्शन रापतवार व संयोजिका रेखा देशमुख यांनी केले आहे. या स्पर्धे साठी काही नियम व आटी घालून देण्यात आल्या आहेत. त्या खालील प्रमाणे आहेत. अ) शब्द मर्यादा : किमान १५०० व कमाल २०००. ब) लेखन पाठवण्याची अंतिम तारीख : ३० ऑक्टोबर २४ क) पाठण्याचे ठिकाण : व्हाट्स एप- ९९६०८२१२४९, ई-मेल- ., प्रत्यक्ष लेखन आणून देण्याचे ठिकाण : यशश्री खादी भांडार, नगरपालिका संकुल, आंबाजोगाई. (या दोन्हीपैकी कोणताही एक पर्याय निवडू शकता) १) लेखाच्या शेवटी: 'प्रस्तुत लेख मी स्वतः लिहिला असून, या लेखाची पूर्ण जबाबदारी माझी आहे' अशी हमी लिहिणे अनिवार्य आहे. २) हमी नंतर आपले पूर्ण नाव, पोस्टाचा पिनकोड सह पूर्ण पत्ता, मोबाईल नंबर लिहावा. ३) ही खुली स्पर्धा आहे. या स्पर्धेत आंबाजोगाईचा कोणताही व्यक्ती भाग घेऊ शकतो. वयाचे बंधन नाही. ४) ११ व्या आंबाजोगाई साहित्य संमेलनाच्या आयोजन समितीचे सदस्य, स्पर्धेचे परीक्षक या स्पर्धेत भाग घेऊ शकणार नाहीत. ५) या स्पर्धेला भाषेचे बंधन नाही, मराठी, हिंदी, उर्दू, इंग्रजी वा अन्य भाषेतील लिखाणाचे स्वागत राहील. ६) विजेत्या तीन स्पर्धकांची निवड केली जाईल व ११ व्या आंबाजोगाई साहित्य संमेलनाच्या मंचावर प्रत्येकाला स्मृती चिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरव केला जाईल. ७) स्पर्धेत सहभागी झालेली सामुग्री परत दिली जाणार नाही.८) परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.या सर्व नियम व अटी स्पर्धेत सहभाग घेणारांसाठी बंधनकारक असतील.

# प्रा.प्रकाश खळगे यांचा पिंपरखेड येथे ३० वर्षापासून ज्ञानयज्ञ

## छत्रपती शाहू महाराज वाचनालयाच्या माध्यमांतून विविध कार्यक्रम

**वडवणी । प्रतिनिधी**

**पिंपरखेड येथील रहिवासी असलेले लोकमान्य टिळक महाविद्यालयातील प्राध्यापक प्रकाश खळगे सर यांनी मागील २५ ३० वर्षापासून पिंपरखेड गावामध्ये विविध सामाजिक उपक्रम राबविलेले आहेत. छत्रपती शाहू महाराज वाचनालयाच्या माध्यमातून त्यांनी या गावांमध्ये अनेक सामाजिक सेवा उपलब्ध केलेल्या आहेत. त्यांनी निर्माण केलेल्या ज्ञान यज्ञाच्या माध्यमातून पिंपरखेड गाव प्रकाशमान झालेले आहे. आता या गावातील विद्यार्थ्यांसाठी ज्ञानदानाचे काम चालू करून गावातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करणे त्याचबरोबर ग्रंथ वाचन, बक्षीस वितरण, ग्रंथ प्रदर्शन यासारख्या विविध कार्यक्रमाचे आयोजन रविवार दिनांक २१ जुलै रोजी करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन प्रा. प्रकाश खळगे सर यांच्यासह वाचनालयाच्या अध्यक्षा विशाखा खळगे, ग्रंथपाल सौ पल्लवी कोरडे, सौ. शीलाताइ उजगरे यांनी केले आहे.**

पिंपरखेड सारख्या ग्रामीण भागात ज्यावेळी शिक्षणाची कोणतीही सुविधा उपलब्ध नव्हती त्याकाळी प्राध्यापक प्रकाश खळगे यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीचा सामना करीत उच्च शिक्षण घेतलं. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत खराब असतानाही प्रकाश खळगे सर यांनी संघर्ष करत केवळ स्वतः शिक्षण घेतलेच नाही तर गावातील इतर गरजूंना शिक्षण देण्यासाठी त्यांनी अहोरात्र मेहनत घेतली. त्यांच्या जीवनामध्ये अनेक संघर्ष आले नोकरीला लागल्यानंतरही अनेक दिवस पगाराशिवाय काम करण्याची वेळ आल्यामुळे त्यांचे कुटुंब अडचणीत आलं होतं. तरीही त्यांनी धीर धरून काम केलं आणि समाजसेवा चालूच ठेवली. या काळात त्यांनी पिंपरखेड येथील विद्यार्थ्यांसाठी क्लासेस चालू केले. छत्रपती शाहू महाराज वाचनालयाची निर्मिती करून गावातील विद्यार्थ्यांसाठी विविध ज्ञानसंपन्न ग्रंथ उपलब्ध करून दिले. या ग्रंथ पुस्तकाचा उपयोग गावातील अनेक विद्यार्थ्याला होऊ लागला. त्यामुळे अनेक विद्यार्थी देखील प्राध्यापक प्रकाश खळगे सर यांच्यामुळे घडले आहेत. या वाचनालयाच्या माध्यमातून अनेक वर्षापासून सामाजिक उपक्रम राबविले जातात. गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षीस वितरणही केले जाते. शालेय विद्यार्थ्यांना मनोबल वाढावं मुलींना पालकांनी शाळेत पाठवावं यासाठी प्रकाश खळगे सर यांनी वेळोवेळी प्रयत्न केले. मुलींसाठी त्यांनी गावात क्लासेस सुरू करून अनेक मुलींना शिक्षणाची दारे उघडी करून दिली. प्रकाश खळगे सर यांच्यामुळे अनेक मुली शिकल्या आणि आज त्या स्वतःच्या पायावर उभ्या आहेत. प्रकाश खळगे सर यांनी यावर्षी देखील त्यांच्या वाचनालयाच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविण्याचे नियोजन केले आहे. आज रविवार दिनांक २१ जुलै रोजी छत्रपती शाहू महाराज वाचनालय पिंपरखेड येथे ग्रंथ प्रदर्शन त्याचबरोबर गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आणि बक्षीस वितरण करण्यात येणार आहे. यावेळी ग्रंथ वाचक जनजागृती करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी गावच्या सरपंच लता शिंदे, उपसरपंच अशोक निपटे, दत्तगुरु बँकेचे अध्यक्ष गजानन निपटे, पत्रकार सतीश मुजमुले यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या कार्यक्रमासाठी पिंपरखेड आणि वडवणी तालुक्यातील सर्व शिक्षणप्रेमी नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन प्राध्यापक प्रकाश खळगे सर यांच्यासह या वाचनालयाच्या अध्यक्ष कु. विशाखा प्रकाश खळगे, ग्रंथपाल सौ. पल्लवी कोरडे, सहा. ग्रंथपाल सौ. शिलाताई उजगरे यांनी केले आहे. या कार्यक्रमाच्या नियोजनामध्ये अग्नीताई खळगे, प्रा. उदय खरात, क्रांती खळगे, सविता खळगे यांचे देखील सहकार्य लाभणार आहे.

# पान १वरून...

## चिंताजनक: महाराष्ट्रातील

पावसाने भातसा धरणासह सुर्या धामणी व अप्पर वैतरणा धरणातील पाणीसाठ्यात वाढ होत असून कोकणातील धरणे आता ५० टक्क्यांपर्यंत पोहोचली आहेत. यामध्ये भातसा- ५४.४२%, सूर्या धामणी- ५०.६८, अप्पर वैतरणा- ३७.५० एवढा पाणीसाठा वाढला आहे. तर मराठवाड्यासाठी चिंतेची बाब असून सर्वच धरणात अत्यल्प पाणीसाठा आहे. त्यामुळे मोठ्या पावसाची अजून तरी प्रतिक्षा आहे.

------------

## राज्यात ४१ दिवसांनी

स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचीही तयारी केली आहे. तर, सर्वच राजकीय पक्ष विधानसभा निवडणुकांसाठी कामाला लागले असून पदाधिकारी मेळावा आणि कार्यकर्त्यांसाठी बैठकांचं आयोजनही केलं जात आहे. त्याच पार्श्वभूमीवर आज उद्ध ठाकरे यांनी शिवसेना भवन येथे पक्षाच्या विधानसभा संपर्कप्रमुखांचा मेळावा घेतला. त्यामध्ये, पुढील ४१ दिवसात आचार संहिता लागेल, त्यामुळे जोमाने काम करा, असे निर्देशच उद्धव ठाकरे यांनी विधानसभा संपर्कप्रमुखांना दिले आहेत. त्यामुळे, उद्धव ठाकरेंनी विधानसभा निवडणुकांचे रणशिंग फुंकताना आचारसंहिता कधी लागू होणार, याची तारीखच सांगितली आहे.

---------

## जगाला पुन्हा टेन्शन!

नव्या व्हेरियंटची लागण होत आहे. टेटेडा यांनी दिस विक इन एशियाला दिलेल्या माहितीनुसार, दुर्दैवाने व्हायरल प्रत्येकवेळी रुप बदलत असून तो अधिक हानिकारक आहे. लसीकरणानंतर लोकांची प्रतिकारशक्ती कमी होत आहे. त्यामुळे या व्हायरसवर मात करण्यासाठी रुग्णांच्या शरीरात पुरेशी प्रतिरकारशक्ती नसते.

---------------

## ना रांगा, ना वेटिंग... विधानसभेला

वेळेस झालेल्या सावळ्या गोंधळानंतर मतदान केंद्रांची संख्या वाढवण्याची मागणी केली होती. याच मागणीची दखल घेत केंद्रीय निवडणूक आयोगाने एका मतदान केंद्रावर १५०० मतदारच असावेत अशी सूचना राज्य निवडणूक आयोगातील अधिकाऱ्यांना केली आहे. त्यामुळे विधानसभेला मुंबईबरोबरच राज्यातील नागरिकांना गोंधळविरहित मतदान करता येईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. ना रांगा, ना वेटिंग... विधानसभेला सुपरफास्ट मतदान करता येणार आहे.

**नव्या सूचना काय?**

मतदार केंद्रांची विभागणी झाली तरी नवीन मतदार केंद्र हे मूळ मतदार केंद्राच्या इमारतीतच असणं आवश्यक आहे. ज्या इमारतीमध्ये एकापेक्षा अधिक मतदान केंद्र असतील आणि अशा केंद्रावर मतदारांची संख्या अधिक असमान असेल तर वाढीव मतदारांना अन्य केंद्रावर स्थलांतरीत करण्यासंदर्भातील तरतूद तयार ठेवावी. या माध्यमातून ऐनवेळी एकाच केंद्रावर होणारी गर्दी टाळता येईल. वाढीव मतदारांना त्याच इमारतीमधील अन्य मतदान केंद्रांवर स्थलांतरीत करुन मतदान प्रक्रियेचा वेग कायम राखता येईल. यासंदर्भातील तयारी केंद्रावर असणं अपेक्षित आहे. वाढीव मतदारांना दुसऱ्या इमारतीमधील मतदान केंद्रावर पाठवू नयेत. हे स्थलांतर करताना एखादी वस्ती, परिसर किंवा अगदी कुटुंबही एकत्र एकाच ठिकाणी मतदान केंद्रावर राहील याची विशेष काळजी घेण्याची आदेश देण्यात आले आहेत. मतदान केंद्राचे विभाजन आणि वाढीव मतदारांचे वाटप करताना भौगोलिक एकसंघता अबाधित राहील असे पाहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

---------------

## जम्मू काश्मीरमध्ये रातोरात

तैनात करण्यात आली. फार काळानंतर या भागामध्ये लष्कराच्या एकंदर हालचाली आणि सशस्त्र सैनिक तैनात झाल्याचे पाहता येत्या काळात भारतीय लष्कर एखाद्या मोठ्या कारवाईच्या दृष्टीने पावलं उचलू शकते असे संरक्षण क्षेत्रातील जाणकारांचे म्हणणे आहे.

------------

## अहिल्यानगर नामांतरास चॅलेंज

पाहायला मिळत आहे. कारण, अहमदनगरचे नामांतर करण्यास विरोध करणारा याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. दरम्यान, राज्य सरकारने या नामांतरास मंजुरी दिली असली तरी अद्याप केंद्र सरकारची मान्यता घेणे गरजेचे आहे. अहमदनगर शहराचे नाव बदलण्याची मागणी अनेक लोकप्रतिनिधी, नागरिक व संघटनांनी केली होती. या संदर्भात विभागीय आयुक्त, नाशिक यांच्याकडून माहिती मागविण्यात येऊन अहमदनगर महानगरपालिका प्रशासनाचा ठराव देखील राज्य शासनास प्राप्त झाला होता. या अनुषंगाने गृह मंत्रालयाच्या सुधारित मार्गदर्शक तत्वानुसार हे नामकरण करण्याची शिफारस करण्यात आली असून केंद्राची मान्यता मिळाल्यानंतर अहमदनगर जिल्हा, तालुका तसेच महानगरपालिका यांच्या नामांतरणाची कार्यवाही महसूल व नगर विकास विभागाकडून करण्यात येईल. मात्र, तत्पूर्वीच या नामांतराविरुद्ध याचिका दाखल झाली आहे. अहमदनगरचे नामांतर अहिल्यानगर करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाविरोधात मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. माजी कुलगुरू सर्जेराव निमसे, अर्शद शेख आणि पुष्कर सोहोनी यांनी ही याचिका दाखल केली असून याची पहिलीच सुनावणी ही २५ जुलै रोजी होणार आहे.

------------------------

## लाडकी बहीण योजनेसाठी

योजनेला सर्वात जास्त प्रतिसाद मिळत आहे. आमच्यासाठी ही गोष्ट समाधानकारक आहे. जे टीका करत आहेत.ते त्यांच्या मतदार संघात त्यांचे बॅनर लावून कॅम्प आयोजित करत आहेत. त्यामुळे महायुती सरकारने आणलेली ही योजना माता भगिनींसाठी किती उपयुक्त आहे. प्रत्येक लोकप्रतिनिधींना माहिती आहे. त्यामुळे एका बाजूला टीका करायची आणि दुसऱ्या बाजूला कॅम्प आयोजित करायचे. आणि वेगळे बॅनर लावून दिशाभूल करायची. अशी भूमिका विरोधकांनी घेतली आहे.

-----------

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार दि. २१ जुलै २०२४



## विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज कडा गट व शिराळ गणाची धिर्डी येथे बैठकीचे आयोजन

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

आष्टी विधानसभा पार्श्वभूमीवर सर्व पक्षाची बांधणी चालू आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदंद्रजी पवार) या पक्षाचे इच्छुक उमेदवार आष्टी



विधानसभा अध्यक्ष राम खाडे व विधिसिलचे मराठवाडा विभाग प्रमुख नरसिंग जाधव हे उमेदवार असून आज दि २१ जूलै रोजी कडा गटाचे बैठकीचे आयोजन जि. प सदस्य गंगाआबा आजबे यांच्या अध्यक्षतेखाली सर्व गटातील गण प्रमुख व गट प्रमुख सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी मोठया संख्येने उपस्थित राहावे गेल्या लोकसभा निवडनुकित कडा जि प गटामध्ये मोठे मतदान देऊन राष्ट्रवादी पक्षाचे उमेदवार विजय होण्यास मदत झाली होती त्या पर्शभूमीवर धिर्डी येथे पदाधिकारी कार्यकर्ते यांनी बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन युवा नेते दिपक खिळे यांनी केले आहे.

# दोन आमदाराच्या श्रेयवादात रखडलेल्या रस्ता खासदार करतील का?

## खा. बजरंग सोनवणे यांनी याबाबत लक्ष घालण्याची गरज

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीत ज्या गावाने बजरंग बप्पा सोनवणे यांना तारल त्या गावांना जाण्या येण्या करिता खराब रस्त्यामुळे गावाकऱ्याला करावी लागती रत्यावर कसरत

अंबा सहकारी साखर कारखाना, वाघाळा, राडी, राडी तांडा, व धानोरा, मुडेगाव ,तडोळा ही गावे याचं रस्त्यावर येतात हे विस की.मी अंतर पार करण्या करिता साधारण तासभर लागतो

याच रस्त्यावर धानोरा ग्रामीण रुग्णालय आहे तेथील काही गरोदर माता भगिनींना प्रसूतीसाठी अंबाजोगाई च्या स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय येथे हलवण्यात येते त्यांच्या साठी रुग्ण वाहिका आहे त्याचं रुग्णवाहिकेतून आणताना खड्डे व रस्त्यावरील जम्प मुळे जो त्रास होत असेल तो शब्दात मांडता येणार नाही त्याचं बरोबर तालुक्यातील मोठे पावर स्टेशन आहे वीस हजार लोकसंख्या असलेले दोन-तीन

गावे आहेत गावातून तालुक्याच्या ठिकाणी व कामानिमित्त विद्यार्थी शिक्षणाकरिता अंबाजोगाईला वाहनातून प्रवास करतात लहान मोठ्या वाहणाची वर्दळ असून खराब रस्त्यामुळे महामंडाळाच्या बस बंद करण्याची येते यामुळे

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे वारंवार या रस्त्याची बातम्या आमच्या वर्तमानपत्रात आम्ही केल्या असून आज पर्यंत याबाबत कुठली ही दखल घेतली गेली नाही योगायोगाने दोन मतदारसंघात अडकलेल्या या दोन विद्यमान आमदार, विद्यमान पालकमंत्री, असताना देखील रस्त्या बाबत दिरगाई दिसून येत आहे नवीन निवडून आलेले






विद्यमान खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी या रस्त्याकडे लक्ष घालून त्या ठिकाणच्या मतदाराला मतदान केल्याबद्दल उत्तरदायित्व करण्याची एक संधी मिळेल अशी मागणी गावकऱ्याकडून कर्मचाऱ्याकडून व विद्यार्थ्याकडून होत आहे

## विशाळगड, गाजापुरातील कृत्यांचा जातेगाव येथील मुस्लीम समाजाकडून निषेध

**जातेगाव । प्रतिनिधी**

विशाळगडावरील हजरत मलिक दर्ग्यासह गजापूर येथील मुस्लिम आणि हिंदू समाजातील महिला आणि लहान मुलांवर दगडफेक करून जखमी करणाऱ्यांचा निषेध नोंदवित त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी येथील मुस्लिम समाजाकडून करण्यात आली.



मुस्लिम समाजाने येथील तलवाडा पोलीस ठाणे येथे निवेदन दिले. यावेळी दत्ताभाऊ वाघमारे, सोहेल शेख, आरेफ शेख, मोहसीन शेख, सत्यप्रेम पवार, गफार शेख, असेफ शेख, सुरेश कारके, राहील शेख, मुक्तार सय्यद, मतीन शेख, यांच्यासह शेकडो मुस्लिम बांधव उपस्थित होते. १४ जुलैला विशाळगडावरील हजरत मलिक रेहान यांच्या दर्ग्यावर काही विघ्नसंतोषी जमावाने दगडफेक केली. यात मुस्लिम समाजातील महिला तसेच हिंदू समाजातील महिला, लहान मुले तसेच स्थानिक लोक गंभीर जखमी झाले. याशिवाय गडावर राहणाऱ्या लोकांची घरे उद्ध्वस्त केली आहेत. विशाळगडापासून सहा किलोमीटर अंतरावर असलेल्या गजापूर येथील मुस्लिम समाजाची बंद घरे फोडून अज्ञात जमावाने प्रापंचिक साहित्याची नासधूस केली. घरातील जीवनावश्यक वस्तूंची नासाडी केली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेच्या भाजीच्या देठालाही हात लावू दिला नाही, असे असताना काही माथेफिरूंनी छत्रपती शिवरायांच्या गडावर संविधान आणि कायदा धाब्यावर बसवून हा प्रकार केला आहे. या सर्व प्रकाराचा आम्ही निषेध करीत असून, या प्रकाराची चौकशी करून कारवाई करावी. ज्यांची घरे उद्ध्वस्त केली आहेत, त्यांना शासनाने पाच लाख रुपये मदत करावी, अशी मागणीही यावेळी बांधवांनी केली.

## रमेश आडसकर यांचा तिगाव येथील मुळे कुटुंबाला आर्थिक मदतीचा हात

**वडवणी । प्रतिनिधी**

बीड येथील मा मनोज़दादाजरांगेपाटील याच्या शांतता रॅलीतून परत येत असताना तिगाव येथील मराठासेवकबाबासाहेबभीमरावमुळे यांचे अपघाती निधन झाले होते. आज त्यांच्या कुटुंबीयांना माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे नेते रमेश आडसकर यांच्या वतीने आर्थिक मदत करण्यात आली.

त्यांच्या पश्चात छोटी दोन मुले पत्नी असे कुटुंब आहे. घरची परिस्थिती अत्यंत नाजुक असल्यामुळे व घरातील कर्त्या व्यक्तीच्या निधनाने मुळे कुटुंबावर दुःखांचा डोंगर कोसळला आहे. बाबासाहेब मुळे यांच्या दोन्ही मुलांच्या शिक्षणासाठी आर्थिक मदत म्हणून पन्नास हजार रुपयांचे फिक्स डिपॉझिट जेणेकरून त्यांच्या पुढील काळात शैक्षणिक इतर कामाला येईल म्हणून खारीचा वाटा उचलत मा रमेशराव आडसकर साहेब यांच्या वतीने बीड जिल्हा सचिव बबनरावबप्पासोळंके वडवणी तालुकाध्यक्ष पोपटरावशेंडगे माजलगाव शहराध्यक्ष अँडसुरेशरावदळवे, अनंतरावशेंडगे,अर्जुनपायघन यांनी त्यांच्या घरी जाऊन सांत्वन पर भेट घेतली व श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी मनोज दादा जरांगे पाटील यांचे आंदोलनातील सहकारी संतोषदादाडावकर हे ही उपस्थित होते यावेळी मराठा सेवक के. बाबासाहेब मुळे हे शांतता रॅली च्या दिवशी वडवणी येथील रमेशराव आडसकर साहेब यांच्या वतीने जे खिचडी व पाणी वाटप ठेवण्यात आले होते त्यामध्ये बाबासाहेब मुळे यांनी सक्रिय सहभाग घेतला होता.

## बशीरगंज येथील निदर्शनास ऑल इंडिया पँथर सेनेचा जाहीर पाठिंबा-पँथर नितीन सोनवणे

**पाटोदा । प्रतिनिधी**

मुस्लिम समाजाच्या अस्मितेचा आणि भावनांचा संबंध ज्या धार्मिक स्थळाशी असतो त्या धार्मिक स्थळावर काही द्वेषीवृत्तीचे लोक अचानकपणे हल्ले चढवतात हातात तलवारी काठ्या घेऊन मुस्लिमांच्या धर्मस्थळाची आणि घरादारांची संपत्तीची तोडफोड करून त्यांच्या संपत्तीची लूट करतात त्यांना मानसिक आर्थिक नुकसान पोहोचवतात याला तीन-चार दिवस उलटून गेले तरी यावर सत्ताधारी पक्ष व विरोधी पक्ष व मीडिया बोलायला तयार नाही याचा ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने जाहीर निषेध करत आहोत.



विशाळगडाच्या अतिक्रमणाचा विषय हा न्यायालयीन प्रक्रियेचा भाग आहे त्यासाठी कायदा आहे शासन आहे कायद्यानुसार त्यावर निर्णय होईल अशाप्रकारे धुडगुस घालून तलवारी हातात घेऊन उद्रेक पसरवण्याचा प्रकार पुरोगामी महाराष्ट्रात होत आहे हा अशोभनीय आहे आणि स्वतःला पुरोगामी म्हणून घेणारे या गंभीर प्रकरणावर साधी प्रतिक्रिया सुद्धा देत नाहीत ही सर्वात मोठी शोकांतिका आहे विशाळगड प्रकरणातील आरोपींना कठोर शिक्षा करण्यात यावी त्या ठिकाणी झालेल्या नुकसानीची नुकसान भरपाई देण्यात यावी व कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी पदाचा राजीनामा द्यावा अशी ऑल इंडिया पँथर सेना बीड जिल्ह्याच्या वतीने मागणी करत आहोत.

संघटनेच्या वतीने आम्ही जिल्हाधिकारी मार्फत गृहमंत्र्याकडे मागणी करत आहोत या सर्व घडलेल्या घटनेची सखोल चौकशी मार्फत करण्यात यावी. यामधील सर्व हल्लेखोरांवर कायद्या अंतर्गत कडक कारवाई करण्यात यावी.संबंधित निष्क्रिय पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे तात्काळ निलंबित करण्यात यावे. मुस्लिम समाजाच्या घरांची प्रत्येकी १० लाख रुपये व स्थळांची शासनाने नुकसान भरपाई देण्यात यावी. अन्यथा ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने तीव्र आंदोलन केले जाईल.

## केज-कळंब रस्त्यावरील जुन्या पुलावरील रस्त्याची तातडीने दुरूस्ती करा

### दुर्लक्ष केल्यास तीव्र आंदोलन करणार - संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रविण ठोंबरे यांचा इशारा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील केज ते कळंब रस्त्यावरील मांजरा नदीचा नवीन पूल होईपर्यंत जुन्या पुलाच्या दोन्ही बाजूचा रस्ता व पुलाची दुरूस्ती तात्काळ करण्याची मागणी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रविण ठोंबरे यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे केली आहे.



या संदर्भात राज्याचे मुख्यमंत्री यांना संभाजी ब्रिगेडच्या वतीने यापूर्वी निवेदन देण्यात आले आहे. आमच्या प्रतिनिधीशी बोलताना संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रविण ठोंबरे यांनी सांगितले की, बीड जिल्ह्यातील केज ते कळंब रस्त्यावर मांजरा नदीचा जुना पुल आहे. सदर ठिकाणी नवीन पुलाचे काम जवळपास मागील चार ते पाच वर्षांहून अधिक काळापासून सुरूच आहे. परंतु, अद्यापही सदर नवीन पुलाचे व पुलाला जोडणाऱ्या दोन्ही बाजूंच्या रस्त्याचे काम हे पूर्ण झालेले नाही. त्याठिकाणी असलेल्या जुन्या पुलावरील रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहेत. पुलाचे कडेही तुटले आहेत. त्यामुळे मोठा अपघात होण्याची शक्यता असून सदर जुना पुल हा वाहतूकीसाठी अत्यंत धोकादायक बनला आहे. त्यामुळे नवीन पुलाचे काम होईपर्यंत जुन्या पुलावरील रस्ता व पुलाची दुरूस्ती करणे हे अत्यंत आवश्यक आहे. केज ते कळंब हा रस्ता पूर्वी राज्य रस्ता होता. त्यानंतर सदर रस्ता हा राज्य रस्ते विकास महामंडळाकडे हस्तांतरित झाला आहे. त्यामुळे पर्यायी रस्ता व्यवस्थित करण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदारावर असताना ही सदर अत्यंत वर्दळीच्या रस्त्यावर अधिकारी व संबंधित कंत्राटदार हे दुरूस्ती बाबत दुर्लक्ष करीत आहेत. ही अतिशय गंभीर बाब आहे. तरी बीड जिल्ह्यातील केज ते कळंब रस्त्यावरील मांजरा नदीचा नवीन पूल होऊपर्यंत जुना पूलाच्या दोन्ही बाजूचा रस्ता व पुलाची त्वरित दुरूस्ती करण्याबाबत राज्य सरकारने सार्वजनिक बांधकाम विभागाला आदेश द्यावेत अशी मागणी जिल्हाध्यक्ष प्रविण ठोंबरे यांनी केली आहे.

अन्यथा तीव्र आंदोलन करणार :

केज - खामगाव - पंढरपूर महामार्गावरील केज तालुक्यातील मांगवडगाव फाटा ते मांजरा नदीवरील पुल, कळंब शहराजवळील धाराशिव जिल्हा हद्दीपर्यंत अत्यंत खराब व नादुरूस्त रस्त्यामुळे चालू मालवाहतूक वाहनातून शेतमाल चोरीला जात असल्याच्या घटना अनेकदा घडल्या आहेत. तसेच वाहनांचे, विशेषतः दुचाकी अपघात झाले आहेत, सोयाबीनचे कट्टे चोरीच्या घटना ही घडलेल्या आहेत. परिणामी शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत आहे. तसेच या नादुरूस्त रस्त्यामुळे आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूर वारी करणाऱ्या वारकऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागला आहे. या संदर्भात राज्याचे मुख्यमंत्री यांना यापूर्वी संभाजी ब्रिगेडच्या वतीने निवेदन देण्यात आले आहे. त्यामुळे रखडलेले काम तात्काळ सुरू करावे अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल याची सरकार आणि प्रशासनाने नोंद घ्यावी.

- प्रविण उत्तमराव ठोंबरे
(जिल्हाध्यक्ष, संभाजी ब्रिगेड, बीड

## नियमबाह्य संस्थाकडून हेल्थ सॅनिटरी इन्स्पेक्टरच्या विद्यार्थ्यांचे वाटोळे - माधव मुंडे

**परळी । प्रतिनिधी**

सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील करिअरसाठी शेकडो तरुण- तरुणी तयारी करतात.त्यासाठी संबंधित शिक्षण निवडतात.मात्र, निवडण्यात आलेल्या संस्थेत आरोग्य संबंधित अभ्यासक्रम मान्यताप्राप्त आहे का? याची चाचपणी करीत नाहीत तर ती संस्था सुध्दा विद्यार्थ्यांना अंधारात ठेवते आणि स्वच्छता निरीक्षक या आरोग्य विभागाशी संबंधित अभ्यासक्रमासाठी हजारो रुपये विद्यार्थ्यांकडून जमा करीत आहेत.अश्याप्रकारे या संस्था अनेक वर्षापासून विद्यार्थ्यांचे वाटोळे करत आहेत.

राज्यातील आरोग्य विभागात समाजासाठी निवड झालेल्या ८२५ पैकी ४७७ उमेदवारांनी ज्या संस्थेतील स्वच्छता निरीक्षक प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र घेतले आहे त्या प्रमाणपत्र



देणाऱ्या संस्थेची नोंदणी , मान्यता शासनाच्या कुठलीच मान्यता नाही, नोंदणीकृत नसल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे ४७७ स्वच्छता निरीक्षक म्हणून निवड झालेल्या उमेदवारावर टांगती तलवार आली आहे.यावर विद्यार्थ्यांनी शहानिशा न करता स्वच्छता निरीक्षक अभ्यासक्रमासाठी निवडलेली संस्था शासनाच्या नोंदणी पुरस्कृत आहे का किंवा शासनाची मान्यता आहे का हे न पाहता घेतलेला अभ्यासक्रम संस्थेने त्या विद्यार्थ्यांची संस्था नोंदणीकृत असल्याची खोटी माहिती घेऊन विद्यार्थ्यांची फसवणूक केली. अशा संस्थांवर कठोर कारवाई करावी आणि विद्यार्थ्यांनी सुद्धा संस्थेमध्ये प्रवेश घेण्यापूर्वी स्वच्छता निरीक्षक हा अभ्यासक्रम मान्यता प्राप्त आहे की नाही याची शहानिशा करूनच प्रवेश घ्यावा .असे आवाहन राष्ट्रवादी युवक जिल्हा सरचिटणीस तथा श्री वैद्यनाथ आयटीआय चे अध्यक्ष माधव मुंडे यांनी केले आहे.याबाबत माहिती अशी की आरोग्य विभागातील भरती झालेल्या ४७७ उमेदवारांची जबाबदारी कोण घेणार असा प्रश्नही यानिमित्ताने उपस्थित होतो. त्यामुळे भविष्यात स्वच्छता निरीक्षक अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांनी मान्यता प्राप्त संस्थेमध्ये स्वच्छता निरीक्षक मान्यता असलेल्या अभ्यासक्रमालाच प्रवेश घ्यावा. शासनाकडे नोंदणी किंवा मान्यता नसणाऱ्या संस्थामुळे

### 'सार्वजनिक आरोग्य विभागात निवड झालेल्या ४७७ उमेदवाराचे भवितव्य अंधारात'

मान्यताप्राप्त असलेल्या संस्थेकडे प्रवेश घेतल्याचा वाईट परिणाम झालेला दिसतो. या संस्था विद्यार्थ्यांच्या जीवनाशी खेळत आहेत.अशा संस्थांनी विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळू नये अशी मागणी युवा नेते माधव मुंडे यांनी केली आहे. श्री वैद्यनाथ आयटीआय मान्यताप्राप्त. तालुक्यातील श्री वैद्यनाथ आयटीआय कॉलेज हाळम येथे हेल्थ सॅनिटरी इन्स्पेक्टर हा अभ्यासक्रम अभ्यासिला जातो. याला केंद्र शासनाच्या ची मान्यता असून येथे शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यास बोर्डाची डिग्री मिळते

## प्रामाणिकपणे केलेली सेवा मूर्त रूपात प्राप्त होते - ह.भ.प. वैजनाथ महाराज देशमुख

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाईकरांना समृद्ध वारसा लाभलेला आहे. आद्यकवी मुकुंदराज स्वामी पासवडीकर दासोपंत यांच्यासारख्या थोर महात्म्यांचा परिस्पर्श आपल्या अंबाजोगाई परिसराला झालेला आहे त्यामुळे आपली समृद्ध परंपरा पिढी दर पिढी आपण वाढवायला हवी आणखी समृद्ध करायला हवी तरच अंबाजोगाईचे वेगळेपण आपण जपणार आहोत. तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल या संतश्रेष्ठ नामदेव महाराजांच्या अभंगावर निरूपण करताना ह भ प वैजनाथ महाराज देशमुख घाटनांदुरकर म्हणाले की संतश्रेष्ठ नामदेव महाराज पांडुरंग परमात्म्याची एकरूप झाले त्यांच्यासाठी तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल देव विठ्ठल आणि पूजा सुद्धा विठ्ठलच आहे. सध्याच्या काळात आपण हाती घेतलेलं काम प्रामाणिकपणे आणि निष्ठेने जर पार पाडलं तर त्यातच आपल्याला पांडुरंग परमात्मा विठ्ठल भेटू शकतो. प्रामाणिकपणे आणि निस्वार्थ भावनेने केलेली सेवा कधीही वाया जात नाही ती मूर्त रूपाने आपल्याला परत मिळते.

वसुंधरा सेवा प्रतिष्ठान अंबाजोगाई च्या वतीने आषाढी एकादशीनिमित्त अक्षय निवास या ठिकाणी तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल हा अभंग वाणीचा कार्यक्रम संपन्न झाला याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाचे प्रारंभी आंतरराष्ट्रीय ख्यातीचे पखवाज वादक उद्धव बापू आपेगावकर व शिवगड संस्थानचे मठाधिपती ह भ प महारुद्र महाराज खाडे शास्त्री यांचा आयोजक नंदकिशोर मुंदडा यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. पांडुरंग परमात्म्याच्या प्रतिमेचे पूजन करून व दीप प्रज्वलन करून अभंगवाणीला सुरुवात झाली. भजन






सम्राट पंडित शिवकुमार मोहेकर यांनी जय जय राम कृष्ण हरी या रूपावळीतील भजनाने मैफिलीला सुरुवात केली. वारकरी संप्रदायातील अत्यंत महत्त्वाचा नामपुर अभंग अप्रतिमरीत्या सादर करून त्यांनी आपल्या गायनाची सांगता केली. अंबाजोगाईतील ज्येष्ठ गायक सुधीर कुलकर्णी यांनी रखुमाई चे वर्णन करणारा भक्तीरसपूर्ण अभंग सादर केला. ज्येष्ठ गायक श्री श्री यांनी संत सेना महाराज यांचा वेढा रे वेढा पंढरी मोर्चे लावा भीमातीरी हा अभंग अत्यंत तल्लीनतेने सादर करून रसिकांना मंत्रमुग्ध केले. युवा गायिका रोहिणी गायकवाड हिने भक्ती गीत सादर केले. ज्येष्ठ गायिका व स्वरसाधना संगीत विद्यालयाच्या संचालिका सौ मंजुषा देशपांडे यांनी दोन रचना अप्रतिमरीत्या सादर करून रसिकांची मने जिंकली. त्यानंतर युवा गायक प्रदीप चोपणे याने कानडा राजा पंढरीचा हा संत पुरंदरदासांचा अभंग सादर केला. या अभंगानंतर बासरी वादक भागवत पाठक यांनी माझे माहेर पंढरी आहे भिमेच्या तिरी हा अभंग आपल्या बासरीवर सादर करून मैफिलीची उंची वाढवली. शाहीर गणेश मामा काळे यांनी शिव संप्रदाय आणि वारकरी संप्रदाय या दोन्हीचा एकत्रित सुंदर मिलाफ असलेले वसंत गडकर महाराजांनी गायलेले सुंदर पद सादर केले. युवा गायक व स्टार प्रवाह या मालिकेमध्ये मी होणार सुपरस्टार छोटे उस्ताद सीजन थ्री ची बालगाई का उन्नती मुंडे हिचे पिताश्री ऋषिकेश मुंडे यांनी येई वो विठ्ठले भक्तजण वत्सले हा अभंग अत्यंत भारदस्त आवाजामध्ये सादर केला. मैफिलीच्या शेवटी गडदे माऊली चिचखंडी यांनी पारंपारिक मोगरा फुलला ही पारंपारिक भैरवी सादर करून अभंगवाणी कार्यक्रमाचा समारोप केला. या कार्यक्रमासाठी तबला साथ संगत ताल मार्तंड प्रकाश बोरगावकर यांनी केली तर हार्मोनियम साथ संगत पद्माकर महामुनी यांनी केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वारकरी संप्रदायाचे अभ्यासक बालाजी शेरेकर यांनी केले तर आभार वैजनाथ भैय्या देशमुख घाटनांदुरकर यांनी मानले. सर्व कलावंतांचा वसुंधरा सेवा प्रतिष्ठानच्या वतीने आयोजक नंदकिशोर मुंदडा, महादू मस्के, हिंदूला आबा काकडे ,अमोल विडेकर, महेश अंबाड ,मंदार काटे ,ओंकार पोतदार, अक्षय भुमकर ,सचिन वाघमारे ,सुनील अडसूळ ,सचिन जोगदंड, शैलेश स्वामी, मोबीन पठाण ,अजय राठोड, सत्यप्रेम इंगळे ,आप्पासाहेब कदम ,अमोल पवार ,गौरव अप्पा लामतुरे ,राहुल कापसे मयूर रणखांब ,गौतम बडे, अहमद पप्पूवाले , सुनील मस्के, सोपान मोरे, अभिमन्यू वैष्णव यांनी सर्व गायक वादक कलावंतांचा सत्कार केला. प्रतिवर्षी आषाढी एकादशीनिमित्त वसुंधरा सेवा प्रतिष्ठानच्या वतीने अभंग वाणी मैफिलीचे आयोजन करण्यात येऊन नव्या जुन्या सर्व गायकांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाईल असे आश्वासन वसुंधरा सेवा प्रतिष्ठानच्या वतीने नंदकिशोर मंगळा यांनी सर्व कलावंतांना दिले.

पान ६ वरून...

### केज विधानसभा मतदार

आला आहे. तसेच या रस्त्यांच्या १० वर्षांच्या देखभालीसाठी स्वतंत्रपणे २ कोटी १७ लाखांचाही निधी मंजूर झाला आहे. त्यामुळे लवकरच या रस्त्यांची दुरावस्था संपणार असून नागरिकांना सिमेंट काँक्रीटच्या चकचकीत आणि दर्जेदार रस्त्यांवरून सुखकर प्रवास करणे शक्य होणार आहे. हा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, लोकनेत्या आ. पंकजाताई मुंडे, भाजप नेत्या प्रीतमताई मुंडे यांचे आभार मानले आहेत.

### वाळुंज गावच्या उपसरपंचपदी

आतषबाजीत जल्लोष साजरा केला.या निवडीबद्दल मा . सरपंच विष्णू खाडे,मा.सरपंच सोमीनाथ शिंदे,मा.सरपंच घनशाम खाडे,अशोक राऊत,जनक खाडे,मा.उपसरपंच नवनाथ सोले, सुरेश सातपुते,दादा खाडे,भरत सोले, अंकुश बळे,परसराम शिंदे, सुर्यकांत कुलकर्णी, राजेंद्र पवार, दादासाहेब सोले, कांतीलाल सोले,लहु खाडे, जालिंदर राऊत, जगन्नाथ खाडे ,लक्ष्मण सोले, बाबासाहेब बळे,बाळू शिंदे,भरत वाहटुळे, रामचंद्र खाडे, भाऊसाहेब खाडे, महेश बळे आदींनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या तर ग्रामस्थांनी आपल्यावर सोपविलेली जबाबदार व्यवस्थित पार पाडणार असून ग्राम विकासासाठी सदैव प्रयत्न करेन अशी प्रतिक्रिया नवनिर्वाचित उपसरपंच सौ.शितल बाळासाहेब शिंदे यांनी दिली आहे.

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
रविवार दि.२१ जुलै २०२४
४

# दूध प्रश्न सोडवण्यासाठी सर्व प्रकारचे प्रयत्न करणार

## शरद पवारांचं शेतकऱ्यांना आश्वासन, दूध दर आंदोलनाला पवारांचा पाठिंबा



दूध उत्पादकांच्या प्रश्नाबाबत तातडीने हस्तक्षेप करुन हा प्रश्न सोडवण्यासाठी सर्व प्रकारचे प्रयत्न करु असे आश्वासन राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी दिले आहे. दुधाला ४० रुपये प्रति लिटर दर मिळावा या प्रमुख मागणीसाठी दूध उत्पादक शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने राज्यभर आंदोलन सुरू आहे. आंदोलनाचा भाग म्हणून अकोले तालुक्यातील कोतुळ या ठिकाणी १४ दिवस शेतकरी बेमुदत धरणे आंदोलनावर बसले आहेत. या पार्श्वभूमीवर दूध उत्पादकांच्या प्रश्नांमध्ये लक्ष घालावे अशी विनंती करणारे निवेदन दूध उत्पादक शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने शरद पवार यांना देण्यात आले. यावेळी पवार बोलत होते.

शरद पवारांचा दूध आंदोलनाला पाठिंबा : शरद पवार हे अकोले येथे अशोकराव भांगरे यांच्या जयंती निमित्त आयोजित करण्यात आलेल्या शेतकरी मेळाव्यासाठी आले होते. यावेळी मेळाव्याच्या मंचावर जाऊन शेतकऱ्यांनी हे निवेदन शरद पवार यांना दिले. किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अशोक ढवळे शेतकरी मेळाव्यासाठी उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर मांडणी करत असताना दूध उत्पादकांच्या प्रश्नाबाबत त्यांनी सखोल विश्लेषण केले. दूध प्रश्नावर सुरू असलेल्या आंदोलनास कुणाचा पाठिंबा आहे त्यांनी हात वर करावा असे आवाहन त्यांनी सभेस केले. त्यावेळी हजारोच्या संख्येने उपस्थित असणाऱ्या शेतकऱ्यांनी हात उंचावून या आंदोलनास पाठिंबा दिला. मंचावर उपस्थित असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, खासदार निलेश लंके, खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्यासह सर्वच मान्यवरांनी व उपस्थित शेतकरी कार्यकर्त्यांनी आंदोलनास हात उंच करून पाठिंबा जाहीर केला.

२२ जुलैला अशोक ढवळे उद्धव ठाकरे यांची भेट घेणार : कोतुळ येथे सुरू असलेल्या आंदोलनाला शेतकरी मेळाव्यानंतर किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अशोक ढवळे यांनी भेट दिली. किसान सभेचे राज्य सरचिटणीस डॉ. अजित नवले हे यावेळी उपस्थित होते.

शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांबाबत व विशेषतः दूध उत्पादकांच्या सुरू असलेल्या आंदोलनाबाबत किसान सभेने सक्रियपणे आंदोलनात उतरावे असे आवाहन ढवळे यांनी केले. किसान सभा आंदोलनाच्या पाठीमागे ठामपणे आहेच, शिवाय महाविकास आघाडीच्या सर्वच शीर्ष नेतृत्वाला व सत्तेत असणाऱ्या सर्व सत्ताधाऱ्यांना भेटून दूध उत्पादकांच्या प्रश्नांबाबत लक्ष घालण्याचे आवाहन आपण करणार असल्याचे डॉ. अशोक ढवळे यांनी यावेळी सांगितले. दरम्यान, २२ जुलै रोजी उद्धव ठाकरे यांची भेट घेऊन दूध प्रश्नाकडे त्यांचे लक्ष वेधणार असल्याचेही डॉ. अशोक ढवळे यांनी सांगितले.

# तांदळासह डाळींचं उत्पादन वाढणार

## देशातील ७० कोटींहून अधिक लोकांना मिळणार दिलासा


शेतकऱ्यांसह देशातील नागरिकांसाठी एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. खरीप हंगामात चांगला पाऊस झाल्यानं डाळी आणि तांदळाच्या उत्पादनात वाढ होईल, असा अंदाज सरकारनं व्यक्त केलाय. त्यामुळं येत्या काही महिन्यांत सर्वसामान्यांना महागाईची चिंता करावी लागणार नाही. डाळी आणि तांदळाचं उत्पादन वाढलं तर किंमती कमी होण्याची शक्यता व्यक्त केली जातेय. यामुळं देशातील ७० कोटी जनतेला दिलासा मिळणार आहे. मागील वर्षी तांदळाच्या दरात मोठी वाढ झाली होती. देशाच्या पुरवठ्यात कोणतीही अडचण येऊ नये म्हणून सरकारने निर्यातीवरही बंदी घातली होती. अशीच स्थिती डाळींमध्येही दिसून आली. आता मात्र, डाळ आणि तांदळाच्या उत्पादनात वाढ होण्याचा अंदाज आहे. यातून सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळू शकतो. देशातील सुमारे ७० कोटी म्हणजेच ५० टक्क्यांहून अधिक लोकसंख्या तांदळावर अवलंबून आहे. अशा परिस्थितीत भाताच्या उत्पादनात झालेली अंदाजे वाढ ही अशा लोकांसाठी चांगली बातमी आहे.

भात लागवडीच्या क्षेत्रात मोठी वाढ

मान्सूनच्या चांगल्या पावसामुळं चालू खरीप हंगामात (उन्हाळी पेरणी) भात पिकाखालील क्षेत्रात आतापर्यंत ७ टक्के वाढ झाली आहे. त्यानंतर भाताचे क्षेत्र १६६.०६ लाख हेक्टरपर्यंत वाढले आहे. कृषी मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, गेल्या वर्षी १९ जुलैपर्यंत १५५.६५ लाख हेक्टरवर भाताची पेरणी झाली होती. याचा अर्थ येत्या काही महिन्यांत तांदळाचे उत्पादन वाढल्याने भावावर लक्षणीय परिणाम होणार आहे. सर्वसामान्यांना महागाईचा सामना करावा लागणार नाही. भारताच्या १४० कोटी लोकसंख्येपैकी ७० कोटी म्हणजेच ५० टक्क्यांहून अधिक लोक तांदळावर अवलंबून आहेत. अशा परिस्थितीत तांदळाचे भाव वाढल्याने अशा लोकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. मात्र, आता देशात तांदळाचे उत्पादन वाढले तर सर्वसामान्यांना कमी दरात तांदूळ उपलब्ध होईल.

डाळींचे उत्पादनही वाढणार

कृषी विभागानं दिलेल्या माहितीनुसार, १९ जुलै २०२४ पर्यंत खरीप पिकांच्या लागवडीखालील क्षेत्रात वाढीची आकडेवारी जाहीर केली आहे. आकडेवारीनुसार, कडधान्य पिकाखालील क्षेत्र वाढून ८५.७९ लाख हेक्टर झाले आहे. जे गेल्या हंगामात ७०.१४ लाख हेक्टर होते. भरडधान्य पेरणीखालील क्षेत्र कमी म्हणजे १२३.७२ लाख हेक्टर आहे, जे एका वर्षापूर्वी १३४.९१ लाख हेक्टर होते. या खरीप पेरणी हंगामात अखाद्य श्रेणीतील तेलबियांचे क्षेत्र आतापर्यंत १६३.११ लाख हेक्टर आहे, जे मागील वर्षी याच कालावधीत १५०.९१ लाख हेक्टर होते.



# सेंद्रिय शेतीतील अन्नद्रव्य व्यवस्थापनात तीन घटक आहेत पिकांसाठी वरदान



सध्या जर आपण सेंद्रिय शेतीच्या बाबतीत शेतकऱ्यांचा कल पाहिला तर तो आता हळूहळू वाढताना दिसून येत असून सेंद्रिय शेतीकडे आता बरेच शेतकरी सकारात्मक दृष्टिकोनातून बघत आहेत. रासायनिक खतांच्या अतिरिक्त वापरामुळे जमिनीच्या आरोग्यावर खूप मोठा विपरीत परिणाम होऊन त्याचा थेट परिणाम हा पिकाच्या उत्पादनावर देखील दिसून येत आहे. जर आरोग्याच्या दृष्टिकोनातून विचार केला तर सेंद्रिय शेती शिवाय पर्याय नाही. जर आपण रासायनिक खतांच्या बाबतीत विचार केला तर उत्पादन खर्चात तर वाढ होतेच परंतु जमिनीची रासायनिक तसेच भौतिक, जैविक गुणवत्ता देखील खालावत जाते. सेंद्रिय शेतीमध्ये रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा वापर पूर्णपणे बंद करून सेंद्रिय खते आणि सेंद्रिय कीटकनाशकांचा वापर करणे अभिप्रेत असते. जर आपण सेंद्रिय शेतीमधील अन्नद्रव्य व्यवस्थापना विचार केला तर अनेक सेंद्रिय द्रावणांचा यामध्ये वापर करणे गरजेचे असते. ते पिकावरील किडींच्या तसेच पिकाच्या पोषक घटकांच्या दृष्टिकोनातून खूप महत्त्वाचे असतात. त्यामुळे या लेखामध्ये आपण अशाच तीन महत्त्वपूर्ण सेंद्रिय घटकांची माहिती घेणार आहोत. सेंद्रिय शेतीसाठी आणि पिकांसाठी खूप महत्त्वपूर्ण आहेत.

सेंद्रिय शेतीतील महत्त्वपूर्ण घटक

अमृतपाणी- सेंद्रिय शेतीमधील हा एक महत्वपूर्ण पोषक घटक असून सोप्या पद्धतीने अमृत पाणी तयार करता येते. त्यासाठी तुम्हाला गाईचे दहा किलो शेण, गाईचे तूप २५० ग्रॅम आणि गूळ/मध पाचशे ग्रॅम हे मिश्रण २०० लिटर पाण्यामध्ये चांगले मिसळून तयार केलेले अमृत पाणी तुम्ही ३० दिवसांच्या अंतराने एक एकर क्षेत्रासाठी पाण्याच्या माध्यमातून पिकांना देणे गरजेचे आहे. त्याच्यानंतर एक महिन्याचे पीक झाल्यानंतर झाडांच्या दोन ओळींमध्ये पाण्यातून देता येते. दशपर्णी- दशपर्णी अर्क म्हणजे दहा वनस्पतींचा अर्क होय. यामध्ये तुम्ही कन्हेर, नीम, निर्गुंडी, घाणेरी, पपई, सिताफळ, एरंड, गुळवेल आणि रुई या दहा वनस्पतींचा वापर करावा लागतो.

यामध्ये २० ते २५ किलो पाला, दोन किलो हिरव्या मिरचीचा ठेचा, २५० ग्रॅम लसूण, तीन ते चार किलो शेण, तीन लिटर गोमूत्र हे मिश्रण दोनशे लिटर पाण्यामध्ये मिसळून दररोज तीन वेळा हे मिश्रण ढवळून एक महिना आंबवून पिकावर फवारणीसाठी वापरतात. अशाप्रकारे दोनशे लिटर अर्कांमधून गाळलेल्या पाच लिटर दशपर्णी अर्क अधिक त्यामध्ये पाच लिटर गोमूत्र दोनशे लिटर पाण्यात मिसळून रोग व किडींच्या नियंत्रणासाठी वापरता येते. दशपर्णी अर्काच्या वापरामुळे मुळकुजव्या, मर रोग तसेच भुरी, केवडा, करपा आणि तेल्या इत्यादी रोगांचे नियंत्रण होऊ शकते. पंचगव्य- सेंद्रिय शेतीमध्ये पंचगव्याचे देखील महत्त्व असून पंचगव्य तयार करण्यासाठी पाच किलो शेण, नारळाचे पाणी/गोमूत्र तीन लिटर,गाईचे दूध दोन लिटर, तूप एक किलो हे मिश्रण सात दिवस आंबवून दिवसातून दोन वेळा चांगले हलवून घ्यावे. तयार झालेले पंचगव्य दहा लिटर पाण्यामध्ये मिसळून जमिनीवर पाण्यावाटे फवारावे. एका एकर साठी वीस लिटर पंचगव्य वापरणे शक्य असते.

# रासायनिक शेतीची सुरवात व दुषपरिणाम



जर्मन रसायनशास्त्रज्ञ जस्टस लेबिग यांनी नत्र, स्फुरद आणि पालाश या त्रिसूत्रीचा शोध लावला. सन १९०५ मध्ये फ्रिट्?झ हेबर या शास्त्रज्ञाने हवेतील नायट्रोजनपासून अमोनिया वायू तयार केला. १९१५ मध्ये कार्ल बॉश या शास्त्रज्ञाने कृत्रिम अमोनिया तयार केला. त्याच अमोनियाने पहिल्या महायुद्धात कैसरच्या लढाईमध्ये सुमारे आठ लाख लोकांचा बळी घेतला. युद्ध संपल्यावर मग पिकाची वाढ करण्यासाठी तो शेतकऱ्यांना पुरवायला सुरवात झाली. नंतर पुन्हा आय. जी. फ्राबेन या कंपनीने दुसऱ्या महायुद्धात लोकांना मारण्यासाठी मोठ्या प्रमाणावर अमोनियाची निर्मिती केली.

महायुद्धाच्या शेवटी या वायूची निर्मिती करणाऱ्या अमेरिकन कंपन्यांचा हा अमोनिया, तसेच युद्धभूमीवर डास, माश्या, चिलटे मारण्यासाठी तयार केलेली डी.डी.टी. शेतीकडेच वळविण्यात आली. रासायनिक खतांनी रोगप्रतिकारक शक्ती कमी झालेल्या पिकांवर नवनवीन किडींचा प्रादुर्भाव वाढू लागला. या किडींच्या नियंत्रणासाठी क्लोरडेन, डेल्ड्रीन, एन्ड्रीन, पॅराथिऑन, मॅलेथिऑन यांसारख्या कीडनाशकांची निर्मिती झाली. खते, कीडनाशके, बियाणे, अवजारे, तणनाशके ही आधुनिक शेतीची तंत्रे होती. ही तंत्रे शेतकऱ्याने स्वीकारण्यासाठी अधिक उत्पादनाचे आमिष दाखविण्यात आले. सुरवातीला या तंत्राचे परिणामही तसेच होते. त्यामुळे शेतकरी ते स्वीकारू लागले. त्यासाठी शेतकरी बँका व या तंत्रांचे उत्पादक यांच्याकडून कर्जही स्वीकारू लागले. अनुदान, कर्जामध्ये गुंतली शेती, आधुनिक तंत्रे, अनुदान, कर्ज यांनी अमेरिकन शेतकरी, सरकार यांच्यावर जणू ताबा मिळविला. त्यानंतर कंपन्यांची दृष्टी अधिक फायद्यासाठी तिसऱ्या जगाकडे वळली. जागतिक बँक व अमेरिकी सरकारने ही तंत्रे स्वीकारण्यासाठी भारतावर दडपण आणले. त्यासाठी प्रचंड पैसा पुरविण्यात आला. त्याच सुमारास भारतात दुष्काळाने थैमान घातल्याने भारत सरकारने जनतेचे पोट भरण्यासाठी या सर्वांचा स्वीकार केला. अनुदान, कर्ज या आकर्षक वेष्टनांतून आलेल्या कीडनाशकांचा भारतातील वापर झपाट्याने वाढू लागला. १९६६ पासून १९७८ पर्यंतच्या अवघ्या १२ वर्षांत रासायनिक खतांचा वापर एक दशलक्ष टनांपासून ५० दशलक्ष टनांपर्यंत वाढला. हेक्टरी खतांचे प्रमाण ३.५ किलोपासून ५० किलोपर्यंत वाढले. नंतर १९५० पासून २००१-०२ मध्ये हे प्रमाण १७० पटींनी वाढले. रासायनिक कीडनाशकांच्या वापराचे प्रमाण १९७१ ते १९९४-९५ पर्यंत १०० टक्क्यांनी वाढले. या वाढत्या खर्चाबरोबर दुर्दैवाने शेतीतून मिळणाऱ्या उत्पादनामध्ये तेवढी वाढ झाली नाही. अतिप्रमाणात वापरलेली रासायनिक खते, कीडनाशकांनी नापीक झालेली जमी न आणि शेतकऱ्यांचा अशिक्षितपणा ही मुख्य कारणे यामागे आहेत. १९७७ मध्ये कर्नाटकमधील मालनाड येथे घडलेली घटना ''हंडी सिंड्रोम' या नावाने प्रसिद्ध आहे. या जिल्ह्यात भातासाठी मोठ्या प्रमाणात कीडनाशके वापरली जात. पिकावर फवारलेली कीडनाशके पाण्याबरोबर खालच्या शेतांमध्ये जात होती. या शेतांमधील खेकडे खाल्ल्याने सुमारे २०० मजुरांना पॅरालिसीस दिसून आला. खेकड्यांच्या शरीरात भातासाठी वापरलेल्या कीडनाशकांचे अंश सापडले. असे खेकडे या मजुरांनी खाल्ल्यामुळे त्यांच्यावर हा परिणाम झाला होता.

जागतिक आरोग्य संघटनेच्या नियमाप्रमाणे माणसाच्या शरीरात जास्तीत जास्त १.२५ पीपीएम एवढ्या प्रमाणात डी.डी.टी.चे अंश सापडले, तर फारसा त्रास होत नाही. पण दिल्लीमध्ये केलेल्या चाचणीत या शहरातील नागरिकांच्या चरबीमध्ये सुमारे २० पीपीएम एवढे डी.डी.टी.चे अंश सापडल्याचा अहवाल ''डाऊन टू अर्थ' या मासिकात प्रसिद्ध झाला. पंजाबमध्ये हरितक्रांतीचा उच्चांक साधला गेला. आज पंजाबमधील भटिंडा जिल्ह्यातून गंगानगर येथील कर्करोगावर उपचार करणाऱ्या हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी कर्करोगाने आजारी रुग्ण रोज एक रेल्वेगाडी भरून जातात. दुर्दैवी गाडीचे नाव ''कॅन्सर एक्स्प्रेस' असे लोकांनी ठेवले आहे. हे सर्व टाळण्यासाठी गरज आहे सेंद्रिय शेतीची व्? पर्यावरण सांभाळण्याची.

# दिन विशेष

### महत्वाच्या घटना

३५६ : ३५६ इ.स. पूर्व : जगातील सात आश्चर्यांपैकी एक एफिसस आर्टेमिसचे मंदिर नष्ट झाले.
१८३१ : बेल्जिअमचा पहिला राजा लिओपॉल्ड याचा शपथविधी झाला.
१८७९ : क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांना इंग्रजांनी अटक केली
१८८३ : कोलकाता येथे पहिल्या नाट्यगृहाची स्थापना
१८८४ : लॉर्डस मैदानात पहिले क्रिकेट टेस्ट मॅच: सेंट जॉन्सवूड यांनी लंडनमध्ये लॉर्डस मैदानाचा शोध लावला. त्यामुळेच या मैदानाचे नाव लॉर्डस ठेवण्यात आले. या लॉर्डस मैदानावर पहिला कसोटी सामना खेळवण्यात आला.
१८८८ : स्कॉटिश शोधकर्ता आणि पशुवैद्यकीय सर्जन जॉन बॉयड डनलॉप यांनी रबराचे टायर आणि ट्यूब तयार करून परिवहन करण्यास गती निर्माण करून दिली.
१९४४ : २० जुलै १९४४ रोजी ॲडॉल्फ हिटलरची हत्या करण्याचा प्रयत्न करणाऱ्या क्लाऊस व्हॉन स्टाऊफेनबर्गला फाशी देण्यात आले.
१९५४ : पहिले इंडोचिनी युद्ध जिनिव्हा परिषदेने व्हिओतनाम देशाचे उत्तर व्हिएतनाम आणि दक्षिण व्हिएतनाममध्ये विभाजन केले. २१ जुलै १९५४ रोजी जिनिव्हा येथे झालेल्या एका परिषदेत इंडोचीनची फाळणी करण्याचे ठरले.
१९६० : सिरीमाओ बंदरनायके या श्रीलंकेच्या ६ व्या पंतप्रधान बनल्या. त्या जगातील पहिल्या महिला पंतप्रधान होत.
१९६२ : भारत चीन सीमावाद भारत-चीन युद्ध
१९६३ : कशी विद्यापीठाला विश्वविद्यालयाचा दर्जा मिळाला.
१९७६ : आयर्लंडमधील ब्रिटिश राजदूताची हत्या
१९८३ : अंटार्क्टिकावरील व्होस्टॉक येथे उणे ८९.२ सेल्सिअस या पृथ्वीवरील आत्तापर्यंतच्या सर्वात नीचांकी तापमानाची नोंद केली गेली.
२००२ : जगभर दूरसंचार सेवा पुरवणार्या 'वर्ल्ड कॉम' या अमेरिकन कंपनीने दिवाळखोरी घोषित केली.
२००७ : प्रतिभा पाटील भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती बनल्या: २१ जुलै २००७ रोजी प्रतिभा पाटील यांनी राष्ट्रपतीपदाची जबाबदारी स्वीकारली. भारताच्या राष्ट्रपतीपदावर नेमल्या गेलेल्या त्या पहिल्या महिला होत्या.
२०१८ : भारतामधील सॅनिटरी उत्पादनावरील टॅक्स सरकारने होत असलेल्या विरोधानंतर मागे घेतला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१६ : ब्रिटीश वर्तमानपत्र समूह राईटर चे संस्थापक ज्युलियस राईटर यांचा जन्मदिन.
१८५३ : शंकर बाळकृष्ण दीक्षित ज्योतिर्विद, पाश्चिमात्य व पौर्वात्य जोतिषगणिताचे अभ्यासक, ग्रंथलेखक (मृत्यू: २७ एप्रिल १८९८)
१८९९ : अर्नेस्ट हेमिंग्वे नोबेल पारितोषिक विजेते अमेरिकन लेखक (मृत्यू: २ जुलै १९६१)
१९१० : वि. स. पागे स्वातंत्र्यसैनिक, गांधीवादी कार्यकर्ते, संत वाङ्मयाचे अभ्यासक, महाराष्ट्र विधानसभेचे सभापती, रोजगार हमी योजनेचे जनक (मृत्यू: १६ मार्च १९९०)
१९११ : भारतीय लेखक, कवी आणि विद्वान उमाशंकर जोशी यांचा जन्म. (मृत्यू: १९ डिसेंबर १९८८)
१९२० : आनंद बक्षी गीतकार (मृत्यू: ३० मार्च २००२)
१९३० : डॉ. रा. चिं. ढेरे भारतीय संस्कृतीचे अभ्यासक संशोधक
१९३४ : चंदू बोर्डे भारतीय क्रिकेटपटू आणि निवड समितीचे अध्यक्ष पद्म भूषण, पद्मश्री, अर्जुना पुरस्कार
१९४५ : दक्षिण आफ्रिकेचा क्रिकेट खेळाडू बॅरी रिचर्ड्स यांचा जन्म.
१९४७ : चेतन चौहान सलामीचे फलंदाज आणि राज्यसभा सदस्य
१९५१ : अमेरिकन हास्य अभिनेते रॉबिन विलियम्स यांचा जन्मदिन.
१९६० : पंजाबी गायक अमरसिंग चमकीला यांचा जन्म. (मृत्यू: ८ मार्च १९८८)
१९६८ : आदित्य श्रीवास्तव भारतीय अभिनेते

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९०६ : भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे प्रथम अध्यक्ष व राजकारणी उमेशचंद्र बनर्जी यांचे निधन.
१९७२ : जिग्मे दोरजी वांगचुक भूतानचे राजे (जन्म: २ मे १९२९)
१९९४ : डॉ. र. वि. हेरवाडकर इतिहास संशोधक, वाङ्मय समीक्षक, मराठी बखर वाङ्मयाचे व्यासंगी अभ्यासक (जन्म:)
१९९५ : सज्जाद हुसेन संगीतकार व मेंडोलीनवादक (जन्म: १५ जून १९१७ सीतामहू, मंदसौर, मध्य प्रदेश)
१९९७ : राजा राजवाडे साहित्यिक (जन्म: १ जानेवारी १९३६). राजा राजवाडे यांनी अनेक कादंबऱ्या, कथासंग्रह, कविता संग्रह, ललित गद्य लिहिले आहेत. तसेच त्यांनी सलग ३५ वर्षे १८ नियतकालिकांतून स्तंभलेखन केलं आहे.
१९९८ : अमेरिकन अंतराळवीर ॲलन शेपर्ड यांचे निधन.
२००१ : विझुपुरम चिन्नया तथा शिवाजी गणेशन दाक्षिणात्य अभिनेते (जन्म: १ आक्टोबर १९२८)
२००२ : मराठी चित्रकार गोपाळराव बळवंतराव कांबळे यांचे निधन.
२००९ : गंगूबाई हनगळ किराणा घराण्याच्या शास्त्रीय गायिका (जन्म: ५ मार्च १९१३)
२०१३ : भारतीय मार्शल आर्टिस्ट लूरेम्बॅम ब्रजेशोतोरी देवी यांचे निधन. (जन्म: १ जानेवारी १९८१)

# टोमॅटो लागवड पध्दत

टोमॅटो पिकास स्वच्छ, कोरडे, कमी आर्द्रता असलेले व उष्ण हवामान चांगले मानवते. साधारणतः १८ ते ३० अंश सेल्सिअस तापमानात हे पीक चांगले येते. तापमान ३८ अंश सेल्सिअसवर गेल्यास पिकाची शारीरिक क्रिया मंदावते व पेशींना इजा होते. तसेच तापमान जर १० अंश सेल्सिअसखाली गेले, तरी पिकाच्या वाढीवर प्रतिकूल परिणाम होतो.

पिकास इजा होऊन उत्पादनात मोठी घट येते. जास्त तापमान, कमी आर्द्रता आणि कोरडे वारे असतील, तर टोमॅटो पिकाची फुलगळ होते. उष्ण तापमान व भरपूर सूर्यप्रकाश असणाऱ्या हवामानात टोमॅटो फळांची गुणवत्ता ही चांगली असते, तर रंगदेखील आकर्षक येतो. चांगला निचरा असलेल्या मध्यम काळ्या जमिनीत किंवा पोयट्याच्या जमिनीत हे पीक चांगले येते. हलक्या जमिनीत पीक लवकर निघते, तर भारी जमिनीत फळांचा तोडा उशिरा सुरू होतो; परंतु उत्पादन भरपूर निघते. उन्हाळी टोमॅटो पीक हलक्या व उथळ जमिनीत घेऊ नये. जमिनीचा सामू ६ ते ७.५ दरम्यान असावा.

# मतदान केंद्राचे सुसूत्रीकरण योग्य पद्धतीने केले जाईल: जिल्हाधिकारी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण योग्य पद्धतीने केले जाईल या अंतर्गत कुठल्याही मतदान केंद्रावर अधिक भार पडणार नाही याची काळजी घेतली जाईल तसेच कुटुंबातील सर्व सदस्यांचे एकाच मतदान केंद्रावर मतदान होईल याची काळजी घेतली जाईल यासह नादुरुस्त शाळेऐवजी जवळच्या दुसऱ्या शाळेत मतदान केंद्र ठेवली जाईल याचीही दखल जिल्हा प्रशासनाच्या वतीने घेतली जाणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी आज राजकीय पक्षांसोबत झालेल्या बैठकीत सांगितले. आज जिल्हाधिकारी कार्यालयात मतदान केंद्राचे सुसूत्रीकरण आणि मतदार यादीचे विशेष संक्षिप्त पुनिरीक्षण या विषयावर बैठकीचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी जिल्हाधिकारी बोलत होते. या बैठकीची अध्यक्षता जिल्हाधिकारी श्री पाठक यांनी केली. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गट, अजित पवार गट, शिवसेना शिंदे गट आणि ठाकरे गट, आम आदमी पक्ष, पँथर पक्ष चे प्रतिनिधी उपस्थित होते. यासह उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्र कुमार कांबळे, सहायक निवडणूक अधिकारी कविता जाधव, तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी, नायब तहसिलदार श्री एस. डी. रत्नपारखी उपस्थीत होते.

यावेळी राजकीय पक्षांनी त्यांना जिल्ह्यातील मतदान केंद्रात कुठे बदल करावे याबाबत सूचना केल्या त्यावर त्या सूचनांचा विचार केला जाईल असे, जिल्हाधिकारी यांनी सांगीतले. भारत निवडणूक आयोगाच्या एका मतदान केंद्रावर १५०० पर्यंत मतदार ठेवण्याबाबत सूचना आहेत. ज्या मतदान केंद्रांमध्ये (मतदान यादी भागात) मतदारांची संख्या वाढली असेल( १३५०, १४००, १४५० ई) अशा मतदान केंद्रातील काही मतदानाकरिता नवीन मतदान केंद्र तयार करण्यात यावे व अशी नवीन मतदान केंद्र त्याच इमारतीत असणे आवश्यक आहे कोणत्याही परिस्थितीत मतदार वाढीमुळे झालेल्या नवीन मतदान केंद्र दुसऱ्या इमारतीत ठेवू नये. जय इमारती मध्ये मतदान केंद्र एकापेक्षा जास्त द्र असतील व अशा मतदान केंद्रांची संबंधित मतदारांची संख्या मोठ्या प्रमाणात असमान असेल उदा. मतदान केंद्र १- १,४५० मतदार मतदान केंद्र द२-९०० मतदार मतदान केंद्र ३- ६५० म्हणतात मतदान केंद्र ४- १०५० मतदार अशा प्रकरणी वाढीव मतदार असलेल्या मतदान केंद्राचे मतदान केंद्र क्रमांक एक वाढीव मतदार स्थलांतरित करताना काही बाबींची दक्षता घेणे काही जरुरीचे आहे. असे मतदान केंद्र विभाजन करून नवीन मतदान केंद्राची स्थापना करण्यात यावी किंवा अशा मतदान केंद्राच्या वाढीव मतदारांची त्याच इमारतीत अन्य मतदान केंद्रात नाव स्थलांतरित करण्यात यावे. मात्र असे करताना वाढीव मतदार एकत्रितरित्या एकाच मतदान केंद्रात जोडण्यात यावे याची दक्षता घेणे गरजेचे आहे हे वाढीव मतदार कोणत्याही परिस्थितीत दुसऱ्या इमारतीत कोणत्याही दुसऱ्या केंद्रात जोडण्यात येऊ नये. तसेच असे स्थलांतरण करताना सर्वसाधारण वस्ती मोहल्ला मधील मतदार एकत्रित राहतील तसेच कुटुंब तुटणार नाही याची दक्षता घेण्यात यावी यासह भौगोलिक सलगता कायम राहील याची दक्षता घेण्यात यावी. बीड जिल्ह्यातील मतदारांमध्ये वाढ झाल्यास त्यांना त्याच मतदान केंद्रातील एकाच इमारतीमध्ये असणाऱ्या दुसऱ्या मतदान केंद्राच्या यादीमध्ये समावून घेण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी यावेळी म्हणाले.



प्रारूप मतदार यादीची प्रसिद्धी दिनांक २५ जुलै रोजी होणार असून दावे व हरकती स्वीकारण्याचा कालावधी दिनांक २५ जुलै ते ९ ऑगस्टपर्यंत असणार आहे. पुनरीक्षण कार्यक्रमासाठी विशेष शिबिरे दिनांक २७ आणि २८ जुलै रोजी आयोजित होणार आहे. यासह विद्यार्थी, दिव्यांग, महिला यासाठी विशेष शिबिरे दिनांक १, २ आणि ३ ऑगस्ट रोजी तर तृतीयपंथी, देह व्यवसाय करणाऱ्या महिला, बेघर, भटक्या आणि विमुक्त जाती जमातीच्या व्यक्ती या लक्षित घटकांसाठी विशेष शिबिरे दिनांक ३ आणि ४ ऑगस्ट रोजी, आणि विशेष ग्रामसभा दिनांक २ ऑगस्ट रोजी घेण्यात येईल. दावे व हरकती निकालात काढण्याचा कालावधी दिनांक १९ ऑगस्ट २०२४ पर्यंत आहे. अंतिम मतदार यादी दिनांक २० ऑगस्ट २०२४ रोजी प्रसिद्ध केली जाईल.

## थोडक्यात

### माणुसकी सेवा फाउंडेशनची बैठक

बीड : माणुसकी सेवा फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष ॲड महेश शिंदे यांच्या उपस्थितीत माणुसकी सेवा फाऊंडेशनची बैठक निलध्वज निवास पंचशील नगरयेथे घेण्यात आली. या बैठकीत अनेक विषयांवर चर्चा करून त्याचे निराकरण करण्यात आले. जिल्हाभरात माणुसकी सेवा फाऊंडेशनला खेड्यात, वाडी, वस्ती, तांड्यावर पोहोचविण्यासाठी जिल्हा कार्यकारिणी, तालुका कार्यकारिणी व सर्कल प्रमुख यांनी कामाला सुरुवात करण्याचे या बैठकीमध्ये ठरलेले आहे. यावेही संदीपान हजारे यांनी बैठकीत समाजकारण,राजकारणाचे डावपेच विषयी मार्गदर्शन केले. ही बैठक फाऊंडेशनचे जिल्हाअध्यक्ष मस्के यांच्या अध्यक्षेतेखाली घेण्यात आली. बैठकीला जिल्हा उपाध्यक्ष गंगावणे अंकुश यांनी विविध योजना लोकांपर्यंत कशा पोहचविल्या जातील याचे मार्गदर्शन केले. जिल्हा सचिव ढोकणे विठ्ठल यांनी शासकीय कामाची माहिती दिली. बैठकिस लांडगे सुखदेव,भालेराव बिभीषण, खेमाडे मोहन, डोळस गणपत, शेख रहीम, वाव्हळ आत्माराम, सिरसट शिवप्रसाद, बनसोडे रोहिदास, प्रा, गायकवाड, नितीन शिंदे, वेदपाठक प्रकाश, साळवे अभीमान, भालेराव मल्हारी, इनकर, फुलवरे हिराबाई, पायाळू वैशाली,दळवी कौशल्या यांच्या सह फाउंडेशनचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीची सांगता नितीन शिंदे यांच्या आभाराने झाली.

### राष्ट्रीय माध्यमिक विद्यालयात गुरुपौर्णिमा निमित्त वृक्षारोपण

बीड : राष्ट्रीय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बीड व प्रियदर्शनी प्राथमिक विद्यालय बीड येथे गुरुपौर्णिमा उत्सव आनंदात साजरा करण्यात आला . या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य श्री .चौधरी आर.बी. हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.सौ.मंत्री एस.ए.ह्या होत्या.हा कार्यक्रम स्काऊट व गाईडच्या विद्यार्थ्यांनी आयोजित केला होता. स्काऊट व गाईडच्या विद्यार्थ्यांनी अध्यक्ष व प्रमुख पाहुणे, सर्व गुरुजन व शिक्षकेतर कर्मचारी यांचा सत्कार प्रत्येकी एक वेगवेगळ्या वृक्षाचे रोपटे देऊन केला. यानंतर विद्यार्थ्यांनी गुरुपौर्णिमा निमित्त भाषणे केली.प्रमुख पाहुणे प्रा. मंत्री एस. ए. यांनी गुरुपौर्णिमा निमित्त सर्व विद्यार्थ्यांना गुरु -शिष्य परंपरेचे महत्त्व सांगितले.अध्यक्ष समारोप प्रसंगी प्राचार्य श्री. चौधरी आर.बी. यांनी गुरुपौर्णिमा निमित्त मार्गदर्शन केले.विद्यार्थ्यांनी आव्हान स्वीकारले पाहिजे. अंगी नम्रता आणि जिज्ञासा गुणाद्वारे तो विद्यार्थी यशस्वी होतोच. तेव्हा प्रत्येक विद्यार्थ्यांनी समोर एखादे आदर्श व्यक्तिमत्व ठेवा. त्यांनी केलेल्या कार्याचा बोध घेऊन त्याप्रमाणे मार्गक्रमण करा.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. गौरी वाघमारे तर आभार प्रदर्शन कु. दिशा पवार या विद्यार्थिनींनी केले. या कार्यक्रमानंतर भगतसिंग स्काऊट पथक व सावित्रीबाई गाईड पथकाद्वारे शालेय परिसरामध्ये अध्यक्ष व प्रमुख पाहुणे व स्काऊट गाईड पथकातील विद्यार्थी यांच्या हस्ते वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते

## हरिनामाच्या जयघोषात बीड ते नारायणगड आषाढी वारी

बीड । प्रतिनिधी

श्री क्षेत्र पावन भूमी नारायण गडाला बीड जिल्ह्यामध्ये धाकटी पंढरी म्हणून ओळखले जाते आज आषाढी एकादशी निमित्त खडकपूरा पेठ बीड येथील राधेश्याम प्रतिष्ठान संचलित बीड ते नारायणगड मासिक पायी वारी दिंडी सोहळा आयोजित केला जातो. काल दिनांक १७/०७/२०२४ रोजी आषाढी एकादशीनिमित्त भगवंताचे नामस्मरण करत शेकडो भाविक भक्तांनी श्रीक्षेत्र नारायण गडाचे व नगद नारायण महाराजांचे दर्शन घेतले . आषाढी वारीचा आनंद घेतला .राधेश्याम सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा दिंडी चालक ह.भ.प. भागवताचार्य सचिनजी महाराज सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली प्रत्येक शुद्ध एकादशीला बीड ते नारायणगड पायी दिंडी सोहळा आयोजित केला जातो .यावेळेस दुग्ध शर्करा योग वर्षातली सर्वात मोठी वारी म्हणजे आषाढी वारी .



बीड जिल्ह्यातील धाकटी पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र नारायण गडाच्या या पायी वारी सोहळ्यामध्ये शेकडो भावीक भक्त सामील झाले होते. जागोजागी फराळाचे आयोजन करण्यात आले होते. आषाढी पायवारी वारी निमित्त नारायण गडाला जाणाऱ्या भाविक भक्तांसाठी विविध संघटनांनी फराळाचे आयोजन केले होते. यामध्ये सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स व्यापारी संघटना यांच्या वतीने देखील दिंडीतील वारकऱ्यांना साबुदाणा खिचडी, केळी व चहाची सोय केली होती. यावेळी ह भ प दिंडी चालक सचिन महाराज सपकाळ यांचा रमेश गायके व सर्व व्यापारी संघटनेचे बांधव यांनी सत्कार केला. पुढे दिंडी शिवाजी चौक मार्गे अंबिका चौक पांगरी येथील चारीधाम क्षेत्रावर भाविक भक्तांनी दर्शन घेऊन पुढे ही केतूरा मार्गे आल्यानंतर सरपंच परमेश्वर तळेकर व ग्रामस्थांच्या मार्फत दिंडीतील वारकऱ्यांना फराळाचे वाटप करण्यात आले होते.पुढे ही दिंडी केतूरा मार्गे नारायण गडावर पोहोचली .

### गडाच्या पायथ्याला रिंगण सोहळा

या दिंडी सामील झालेल्या भावीक भक्तांनी, माता-भगिनींनी व बालगोपाळांनी , मुलींनी दिंडी सोहळ्याच्या निमित्ताने नारायण गडाच्या पायथ्याशी भव्य रिंगण सोहळ्याचा आनंद घेतला .या रिंगण सोहळ्यामध्ये हरिनामाच्या गजरामध्ये पावले खेळत व फुगड्याचा आनंद घेत दिंडीत अधिकच भर घातली . टाळ पखवाज व ढोल ताशाच्या गजरामध्ये पुढे नारायण गडावर गेल्यानंतर कळसाचे दर्शन घेऊन दिंडीचा समारोप झाला या आषाढी पायीवारी दिंडी सोहळ्याला शेकडो भाविक भक्त सामील झाले होते जय हरी.

## वाघोरा जि.प.शाळेत अवतरली पंढरी

### संतांच्या वेशभूषेत विद्यार्थी व गावकऱ्यांचा सुद्धा सहभाग

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील वाघोरा जिल्हा परिषद शाळेत दि २० जुलै शनिवार रोजी गुरुपौर्णिमा निमित्त विद्यार्थ्यांच्या अंगी संस्कार रुजवण्यासाठी भक्तिमय वातावरनात विठ्ठल भक्तीचा लढा रंगला आणि दिंडी सोहळा संपन्न झाला.



शाळेतील शिक्षक केशव बादाडे यांनी विद्यार्थ्यांची वेशभूषा व श्रृंगार करून विठ्ठल रखुमाई,संत जनाबाई,संत मुक्ताबाई ,संत मीराबाई,संत तुकोबा,संत ज्ञानोबा,संत चोखोबा,संत सावता यांच्या वेशभूषा साकारून टाळ मृदंगाच्या घोषात विठ्ठल नामाचा गजर करत डोक्यावर कलश, तुलसी वृंदावन, हातात भगव्या पताका घेऊन गावातील सर्व मंदिरात दिंडी सोहळा फुगडी, पावल्या खेळत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. शाळेचे मुख्याध्यापक बादल डेंहगळ, ज्येष्ठ शिक्षक विनोद जाधव, राजेभाऊ आबुज, राहुल खुणे, बबन पोटे, तुलसीदास गुंदेकर, सतीश डोने केशव बादाडे यांच्या सह सर्व शिक्षकांनी फुगडी खेळून उत्साहात सहभाग होता.यावेळी शा. व्य. स.अध्यक्ष अरुण बादाडे, सचिन महाराज यांच्यासह गावातील भाविक भक्त, बाल गोपाळ, माता भगिनी सहभागी झाले. विद्यार्थी व शिक्षकांनी मोठ्या आनंद उत्साहात फुगड्या खेळल्या.दिंडीची सांगता गोड भाताचा प्रसाद वाटप करून करण्यात आली.

## दिपाली उबाळेची महाराष्ट्र पोलीसपदी निवड

बीड । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील मौजे नंदपुर येथील दिपाली चंद्रसेन उबाळेची महाराष्ट्र पोलीसपदी निवड झाली आहे. बीड येथील पोलीस भरती मध्ये दिपाली उबाळेला मैदानी परीक्षेत -४० गुण व लेखी परीक्षेत ७९ असे एकूण -११९ गुण मिळाले व तिची महाराष्ट्र पोलीसपदी निवड झाली. गेल्या ४ वर्षीपासून दिपाली दिवसरात्र पोलीस भरतीचा अभ्यास करीत होती दोन तीन वेळेस तिला अपयश देखील आले होते मात्र तीने न खचता अंगी जिद्द ,चिकाटी,अहोरात्र मेहनत घेऊन हे यश मिळवले आहे. या यशात वडील चंद्रसेन उबाळे आई संगीता उबाळेचा सिंहाचा वाटा आहे. तसेच मोठी बहीण ज्योती उबाळे ( माजलगाव ग्रामीण पोलीस), अश्विनी उबाळे ( पिंपरी चिंचवड पोलीस) यांचे तिला मार्गदर्शन लाभले. तसेच गुरू कृष्णा पाठक सर योध्दा ॲकडमी व गुरु हारदे सर ऑनलाइन पोलीस अकॅडमी यांचे अनमोल मार्गदर्शन मिळाले.

### एकाच कुटुंबात झाल्या तीन मुली पोलीस



पोलीस भरतीची तय्यारी करीत असताना उर्वरित वेळेत दिपाली उबाळेने शेतामध्ये काम करून आपल्या वडीलांना मदत करीत रात्री कठोर परिश्रम घेऊन अभ्यास केला. मोठी बहीण ज्योती उबाळे सन २०१४ ला पोलीस झाली नंतर अश्विनी उबाळे सन २०२२ पोलीस झाली व या वर्षी २०२४ ला दिपाली उबाळेची पोलीस पदावर निवड झाली अश्या एकाच कुटुंबात तीन मुली पोलीस झाल्याने उबाळे कुटुंबाने हॅट्रिक ची नोंद केली आहे. वडील कष्टाळू शेतकरी चंद्रसेन उबाळे यांनी प्रतिकूल परिस्थितीतही आपल्या मुलींना उच्च शिक्षण देण्याचा व महाराष्ट्र पोलीस मध्ये भरती करण्याचा निर्णय घेतला व आपल्या वडीलांच्या निश्चयाचे सार्थक करीत मुला पेक्षा मुली किती भाग्यवान असतात याचे उदाहरण या तीन बहिणींनी पोलीस होऊन दाखवले आहे. दिपालीच्या मोहिनी उबाळे व प्रियांका उबाळे या आणखी दोन लहान बहिणी पोलीस भरतीची तयारी करीत आहेत.तर लहान भाऊ वैष्णव उबाळे नीट परीक्षेची तयारी करीत आहे. ग्रामीण भागात राहून देखील प्रचंड मेहनत व अभ्यासाच्या जोरावर या उबाळे कुटुंबातील गरीब शेतकरी चंद्रसेन उबाळेच्या मुली पोलीस भरतीत यशस्वी होत आहेत हे सर्वांसाठी आदर्शवत उदाहरण आहे. एकूणच दिपाली उबाळेची महाराष्ट्र पोलीसपदी निवड झाल्याबद्दल तिच्यावर सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## २ किलोमीटर चिखल तुडवीत शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांची आर्तहाक

### दासखेड येथील आरगडे, पवार, शिंदे,निर्मळ, गोरे वस्तीवरील विद्यार्थ्यांचे हाल

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील दासखेड गावातील आरगडे वस्ती, पवार वस्ती, शिंदे वस्ती,निर्मळ वस्ती, गोरे वस्ती येथील शालेय विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी दासखेड गावातील जिल्हा परिषद आणि रयत शिक्षण संस्थेच्या शाळेत जाण्यासाठी पावसाळ्यात २ किलोमीटर अंतर हातात चप्पल घेऊन अनवानी पायाने चिखल तुडवीत जावे लागते. पावसाळ्यात आम्हाला त्रास होतो,पाय भरतात, पाय घसरून पडतोत, सटकतोत,निदान शाळेत जाण्यासाठी सरकारने चांगला रस्ता तरी द्या अशी आर्तहाक दिली असुन जिल्हा प्रशासनाने लक्ष देऊन तातडीने रस्ता करून देण्यात यावा अशी खंत विद्यार्थ्यांनी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या सोबत बोलून दाखवली. दरम्यान शासन एकीकडे बारावी, पदवी झालेल्या विद्यार्थ्यांना लाडका भाऊ योजनेच्या नावाखाली हजारों रूपये देत असल्याचा गाजावाजा करत असुन दुसरीकडे मात्र शाळेत जायलाच रस्ता नसल्याचे भयाण वास्तव समोर येत असुन जिल्हा प्रशासनासाठी हि लाजिरवाणी बाब आहे.



दासखेड पासुन २ किलोमीटर अंतरावरील आरगडे, पवार,निर्मळ, शिंदे,गोरे आडनावांची लोकं वस्तीवर वास्तव्य करत असुन दररोज जवळपास ३०० लोकांचा राबता याच रस्त्यावरून आहे.मात्र पावसाळ्यात रस्त्याची दुरावस्था होत असल्याने शालेय विद्यार्थी, बाजारहाट, दवाखाना, दुधदुभतं, भाजीपाला,खत बि बियाणे तसेच ईतर कामांसाठी गावात येजा करावी लागते.परंतु पावसाळ्यात चिखलामुळे अडचण येत असुन गाड्या घसरुन अपघाताच्या घटना घडलेल्या आहेत.शासनाने आम्हा वस्तीवरील ग्रामस्थांसाठी रस्ता दुरुस्त करून देण्यात यावा.अशी मागणी वस्तीवरील ग्रामस्थ नारायण शिंदे, भगवान शिंदे, सतिश ठाकुर,काका पवार यांनी केली आहे. लोकप्रतिनिधी आणि जिल्हा प्रशासन ज्या पद्धतीने लाडकी बहिण योजनेसाठी रविवार सुट्टी असुन देखील शनिवार - रविवार दोन दिवशीय शिबिर घेण्यासाठी जिल्हा प्रशासन धावपळ करताना दिसत आहे.तेच लोकप्रतिनिधी आणि जिल्हा प्रशासन मात्र ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मुलभूत सुविधा असणा-या रस्त्याच्या दुरावस्थेकडे लक्ष द्यायला तयार नाही. ग्रामस्थांनी शासन दरबारी हेलपाटे मारुन सुद्धा त्यांच्या पदरी निराशाच पडत असुन दुसरीकडे मात्र अधिकारी आणि गाव पुढारी संगनमताने कागदोपत्रीच बोगस रस्त्यावर लाखों रूपयांचा मलिदा खाताना दिसत आहे. एकीकडे शाळेत विद्यार्थ्यांची संख्या वाढावावी, विद्यार्थ्यांना शिक्षणाची गोडी लागावी म्हणून विविध उपक्रम राविणा-या जिल्हा प्रशासनाचे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी मोठी कसरत करावी लागते.याकडे मात्र प्रशासनाचे साफ दुर्लक्ष दिसून येत आहे.

## ३९ बीड लोकसभा मतदान केंद्रांमध्ये ७३ ने वाढ होणार

बीड । प्रतिनिधी

३९ बीड लोकसभा मतदारसंघात सहा विधानसभा मतदार संघ असून एकूण मतदान केंद्र २३४४ इतके होते आता यामध्ये ७३ ने वाढ हे मतदान केंद्र आता २४१६ इतके होतील. विधानसभा मतदारसंघ २२८ गेवराई, मूळ मतदान केंद्राची संख्या १९७, प्रस्तावित नवीन मतदान केंद्र ७, प्रस्तावित एकूण मतदान केंद्राची संख्या ४०४ ,प्रस्तावित विलीन/ विभाजन करण्यात येणारे मतदान केंद्र ५, प्रस्तावित मतदान केंद्र ठिकाणात बदल १४, प्रस्तावित मतदान केंद्र नावात बदल २ होणार आहे. २२९ माजलगाव, मूळ मतदान केंद्राची संख्या १७८, प्रस्तावित नवीन मतदान केंद्र १६, प्रस्तावित एकूण मतदान केंद्राची संख्या ३९३ ,प्रस्तावित विलीन/ विभाजन करण्यात येणारे मतदान केंद्र २, प्रस्तावित मतदान केंद्र ठिकाणांबद्दल १५, प्रस्तावित मतदान केंद्र नावात बदल ८ होणार आहे.

२३० बीड, मूळ मतदान केंद्राची संख्या ३७६ ,प्रस्तावित नवीन मतदान केंद्र २०, प्रस्तावित एकूण मतदान केंद्राची संख्या ३९६, प्रस्तावित विलीन/ विभाजन करण्यात येणारे मतदान केंद्र ९, प्रस्तावित मतदान केंद्र ठिकाणात बदल १५ ,प्रस्तावित मतदान केंद्र नावात बदल ५ ने होणार आहे. २३१ आष्टी मूळ मतदान केंद्राची संख्या ४४०, प्रस्तावित नवीन मतदान केंद्र नाही, प्रस्तावित एक मतदान केंद्राची संख्या ४४० प्रस्तावित विलीन/विभाजन करण्यात येणारे मतदान केंद्र ०१ असून प्रस्तावित मतदान केंद्र ठिकाणात बदल ७ असून प्रस्तावित मतदान केंद्र नावात बदल होणार नाही. २३२ केज मूळ मतदान केंद्राची संख्या ४१३ प्रस्तावित नवीन मतदान केंद्र ०७ प्रस्तावित एकूण मतदान केंद्राची संख्या ४२० प्रस्तावित विलीन/ विभाजन करण्यात येणारे मतदान केंद्र २ प्रस्तावित मतदान केंद्र ठिकाणांबद्दल अठरा प्रस्थापित मतदान केंद्र नावात बदल ७ होणार आहे. २३३ परळी मूळ मतदान केंद्राची संख्या ३४० प्रस्तावित नवीन मतदान केंद्र २३ प्रस्तावित एकूण मतदान केंद्राची संख्या ३६३ प्रस्तावित विलीन/ विभाजन करण्यात येणारे मतदान केंद्र ०९ प्रस्तावित मतदान केंद्र ठिकाणात बदल होणार नाही. प्रस्तावित मतदान केंद्र नावात बदल ६ होणार आहे. असे एकूण मूळ मतदान केंद्राची संख्या २३४४ प्रस्तावित नवीन मतदान केंद्र ७३ प्रस्तावित एकूण मतदान केंद्राची संख्या २४१६ प्रस्तावित विलीन/ विभाजन करण्यात येणारे मतदान केंद्र २८ प्रस्तावित मतदान केंद्र ठिकाणात बदल ६९ प्रस्तावित मतदान केंद्र नावात बदल २८ होणार असल्याचे प्रस्तावित आहे.

# माजलगाव शहरात अल्पवयीन मुलीवर लॉजवर नेऊन अत्याचार

## गुन्हा दाखल होऊन १५ दिवस उलटले तरी आरोपी मोकाटच

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरात १४ वर्षीय अल्पवयीन विद्यार्थिनीवर लॉजवर नेवून अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.या प्रकरणी पंधरा दिवसांपूर्वी गुन्हा दाखल होऊनही अद्याप पर्यंत आरोपी मोकाटच आहेत. तसेच आरोपीकडून पीडितेच्या कुटुंबाला केस परत घ्या अन्यथा ठार मारू अशी धमकीही दिली आहे.

याप्रकरणी पीडितेच्या आईने थेट मुख्यमंत्र्याकडे न्यायाची मागणी केली आहे. माजलगाव शहर पोलीस स्टेशन हद्दीत दि ६ जून रोजी नववीत शिकणारी पीडित विद्यार्थिनी रस्त्याने जात होती.त्यावेळी आरोपीने तिला गाडीवर बसवून माजलगाव शहारातील अतिथी लॉजवर नेले व तिच्यावर अत्याचार केला.तसेच याबाबत कुणाला सांगितलं तर जीवे मारीन अशी धमकी दिली.या धमकीमुळे पीडित मुलीने याबाबत कुणालाच काहीच सांगितले नाही परंतु शाळेत जायला नकार दिला,यावेळी आईने कारण विचारले असता तिने घडलेला प्रकार सांगितला.तिने म्हटले की, '४-५ मुलांनी मला गाडीवर बळजबरीने बसवून लॉजवर नेवून अत्याचार केला.तसेच कुणाला सांगितल तर जीवे मारण्याची धमकी दिली.त्यामुळे मला शाळेत जायला भीती वाटत आहे.

माझ्यावर एकाने अत्याचार केला पण लॉजवर साथ देणारे तिघेजण होते. सर्वजण एकाच रूम मध्ये होते.यानंतर आई मुलीला घेऊन पोलीस ठाण्यात गेली व दि ३० जून रोजी आरोपीविरोधात माजलगाव शहर पोलीसात गुन्हा दाखल केला.मात्र या प्रकरणातील आरोपी अद्याप मोकाट आहे.आरोपी पीडितेच्या कुटूंबाला मिटवून घ्या अन्यथा तुमच्या मुलीला उचलून नेवू नेवू अशा धमक्याही देत आहे.दरम्यान, या प्रकरणामुळे शाळकरी मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे या प्रकरणात लक्ष घालून लाडक्या भाचीला न्याय देणार का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

**हे प्रकरण सामुहिक बलात्काराचे आहे. त्यामुळे इतरांवरही गुन्हा दाखल करावा.आरोपीला अटक केली नाही तर पोलीस स्टेशनला घेराव घालण्याचा इशाराही बाबुराव पोटभरे यांनी दिला आहे.**

**आरोपीला अटक करण्यासाठी आमच्या टीम पाठवल्या आहेत. कॉल डिटेल्स तपासली जात आहे.या लॉजवरही कारवाई केली जाईल.
बी.धिरजकुमार, उपविभागीय पोलिस अधिकारी, माजलगाव**

### प्रकरण मिटवुन घ्या म्हणत आरोपीच्या पिडीतीच्या नातेवाईकांना जिवे मारण्याचा धमक्या

# लिंगायत वाणी समाजाचे प्रश्न सोडविणार-डॉ.योगेश क्षीरसागर

## वीरशैव लिंगायत वाणी समाज ट्रस्टच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार



**बीड । प्रतिनिधी**

माजी नगराध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांच्या पुढाकारातून काही वर्षांपूर्वी लिंगायत वाणी समाजासाठी दोन एकर जमीन उपलब्ध करून दिली आहे. त्या जागेवर स्मशानभूमीसह इतर सोयी सुविधा उपलब्ध केल्या आहेत. त्याठिकाणी दोन रूमसाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. यासह समाजाचे इतरही प्रश्न सोडविणार असल्याची ग्वाही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली.

शहरातील पेठ बीड भागातील बुरुड गल्ली येथे वीरशैव लिंगायत वाणी समाज ट्रस्टच्या नूतन कार्यकारिणीतील पदाधिकाऱ्यांचा डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते शुक्रवारी (दि.१९) सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.पुढे बोलताना त्यांनी नूतन कार्यकारिणीतील पदाधिकाऱ्यांना समाजकार्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच, अध्यक्ष रामेश्वरआप्पा कानडे, उपाध्यक्ष अमर ढेपे, सचिव अशोकआप्पा चिपाडे, सहसचिव राहुल मिटकरी, कोशाध्यक्ष विलास बेदरकर, सदस्यपदी पशुपती शेटे, संजय घाळे, अनंत शहागडकर, सचिन रेगुडे, अमोल होणराव, बाळू स्वामी आदींचा निवडीबद्दल सत्कार केला. यावेळी ज्येष्ठ नागरिक अनिलआप्पा मिटकरी, उत्तरेश्वर कानडे, अशोक भुरे, नागेश मिटकरी, बाळू मिटकरी, शिवप्रकाश कानडे, रामलिंग साळप्पा, प्रभुलिंग शेटे, महादेव गाडवे, अर्जुन वडतीले, दत्ता परळकर, विद्याभूषण बेदरकर, शुभम कुलथे, अमोल वडतीले यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आंदोलनकर्त्या मुस्लिम समाजास मराठा समाजाच्या वतीने पाणी वाटप




### मराठा समाजाने जोपासली सामाजिक बांधीलकी

**माजलगाव । प्रतिनिधी**

विशाळगडावर झालेल्या हिंसाचारानंतर संतप्त होत माजलगाव उपविभागीय अधिकारी कार्यालयावर आंदोलन केले. दोन ते तीन तास सुरू असलेल्या या आंदोलनातील मुस्लिम समाजास माजलगाव सकल मराठा समाजाच्या वतीने सामाजिक बांधीलकी जोपासत पाणी बॉटलचे वाटप दि. १९ जुलै २०२४ रोजी करण्यात आले.

मागील तिन ते चार दिवसांपूर्वी विशाळगडाच्या पायथ्याशी काही असामाजिक तत्वाच्या लोकांनी मुसलमानवाडी आणि गजापूर येथील मुस्लिम समाजाच्या घरांवर दगडफेक करत मोडतोड केली होती. तेथील मस्जिदची देखिल तोडफोड केली होती. अतिक्रमण काढण्याच्या नावाने धर्मांधांनी हा हैदोस घातला होता. याचे तिव्र पडसाद सर्वत्र उमटले असून याप्रकरणातील आरोपींवर कठोर कारवाई करून त्यांना शिक्षा द्यावी या मागणीसाठी माजलगाव येथील मुस्लिम बांधवांनी येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयावर सुमारे तीन ते चार तास दि. १९ जुलै रोजी आंदोलन केले होते. या आंदोलन कर्त्यांना सकल मराठा समाज माजलगाव यांच्या वतीने मोफत पाणी बॉटलचे वाटप करत सामाजिक बांधिलकी जोपासली आहे. दरम्यान मराठा समाज आरक्षणप्रश्नी करत असलेल्या आंदोलन, मोर्चा, बैठकीसाठी मुस्लिम समाज नेहमीच पुढाकार घेतो. त्यामुळे सकल मराठा समाजाच्या वतीने या आंदोलनकर्त्यांना पाणी वाटप करण्यात आले.

# जलजीवनची कामे वेळेत पूर्ण न करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई होणार -आ.प्रकाश सोळंके



**माजलगाव । प्रतिनिधी**

शासनाने कोट्यवधी निधी खर्च करून घर तिथे नळ देण्यासाठी पाण्याच्या असुविधेपासून मुक्त करण्यासाठी जलजीवन मिशन ही योजना राबवली.परंतु सातत्याने याबाबत तक्रारी माझ्यापर्यंत येत होत्या.याबाबत मागील काही दिवसांपूर्वी माजलगाव तालुक्यातील योजने संबंधित बैठक घेण्यात आली होती.त्यावेळी राहिलेल्या उर्वरित गावांचा आढावा आ.प्रकाश सोळंके यांनी दि १९ जुलै शुक्रवार रोजी घेण्यात आला.

माजलगाव,धारूर आणि वडवणी तीनही तालुक्यात ज्या - ज्या गावांमध्ये योजनेचे काम निकृष्ट आणि असमाधानकारक झाले आहे,जी कामे अर्धवट अवस्थेत आहेत या कामांचा सविस्तर आढावा घेतला.उर्वरित कामे तात्काळ पूर्ण करून घ्यावीत,अन्यथा संबधित कंपनीवर कायदेशीर कारवाई करावी अशा सूचना आ.प्रकाश सोळंके यांनी यावेळी केल्या.

# वाळुंज गावच्या उपसरपंचपदी सौ.शितल बाळासाहेब शिंदे यांची निवड



### मा.आ.धोंडे समर्थकाला मा.आ.धसांनी न्याय दिला, महायुती धर्म पाळला

**सध्या महायुती सरकार असल्याने मा.आ.भिमराव धोंडे व मा.आ.सुरेश धस दोन्ही दिग्गज नेते भाजप पक्षात असल्याने भारतीय जनता पार्टीचे तालुका उपाध्यक्ष रघुनाथ शिंदे हे मा.आ.भिमराव धोंडे यांचे कट्टर समर्थक असून त्यांच्या वाळुंज ग्रामपंचायत च्या निवडणुकीत धस धोंडे दोन्ही नेत्यांचे कार्यकर्ते खेळीमेळीच्या वातावरणात निवडणूकीत एकत्र राहिले होते.धसांचे वर्चस्व असलेल्या या ग्रामपंचायत मध्ये धोंडे समर्थक रघुनाथ शिंदे यांच्या भावजई सौ.शितल बाळासाहेब शिंदे यांना उपसरपंच पदाची जबाबदारी देऊन महायुती धर्म पाळला असून मा आ.धोंडे यांच्या कार्यकर्त्यांना धसांनी न्याय दिला आहे.**

**आष्टी । प्रतिनिधी**

तालुक्यातील प्रतिष्ठेची समजली जाणारी वाळुंज ग्रामपंचायत हि मागिल अनेक वर्षापासून मा.मंत्री सुरेश धस यांची एकहाती सत्ता राहिलेली आहे.मागिल दिड वर्षांपूर्वी निवडणूक होऊन मा.आ.धस यांनी दणदणीत विजय मिळवला होता.त्यांच्या मार्गदर्शनाखाली ठरवून दिलेल्या नियोजित कार्यकाळामुळे मावळते उपसरपंच नवनाथ सोले यांनी पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त जागी दि.१८ जुलै रोजी सरपंच सौ.मनिषा सुरेश सातपुते यांच्या अध्यक्षतेखाली सदस्यांची बैठक घेण्यात आली यावेळी उपसरपंच पदासाठी सौ.शितल बाळासाहेब शिंदे,सौ.योगिता युवराज खाडे यांचे नामनिर्देशक पत्र दाखल झाले होते.सौ.शितल शिंदे यांना ५ मत मिळाल्याने उपसरपंच पदी निवड झाल्याचे अध्यासी अधिकारी यांनी जाहीर केले सुचक नवनाथ बबन सोले होते .ग्रामसेवक पी.आर.शिंदे, महेश धस,बंडू सातपुते, यांनी काम पाहिले प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी पोलिस गुज्जर, पोलिस काळे यांनी सहकार्य केले उपसरपंच पदी सौ.शितल शिंदे यांची निवड जाहीर होताच समर्थकांनी फटाक्यांच्या ◀◀ पान ३ वर

# केज विधानसभा मतदार संघातील सहा रस्त्यांची दर्जोन्नती

## आ. नमिता मुंदडांचा पाठपुरावा : ४१ किलोमीटरच्या रस्तेकामासाठी ५० कोटींचा निधी मंजूर



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

केज विधानसभा मतदार संघाच्या कर्तव्यतत्पर आमदार नमिता मुंदडा यांच्या पाठपुराव्याला आणखी एकदा यश मिळाले आहे. आ. मुंदडा यांच्या प्रयत्नांमुळे मतदार संघातील सहा रस्त्यांची दर्जोन्नती करण्यास राज्य शासनाने मान्यता दिली असून या रस्त्यांच्या कामासाठी देखभलीसह जवळपास ५० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या निधीतून सिमेंट काँक्रीटचे दर्जेदार रस्ते करण्यात येणार आहेत.

आ. नमिता मुंदडा यांनी ग्रामीण भागाच्या विकासाला चालना देण्यासाठी दळणवळण प्रभावी करण्याच्या हेतूने रस्तेनिर्मिती आणि दुरुस्तीकडे विशेष लक्ष दिले. आ. मुंदडा यांनी शेकडो कोटी रुपयांचा निधी मतदार संघातील रस्त्यांसाठी आणला असून त्यातून शेकडो किलोमीटरचे रस्ते तयार झाले. एवढेच नव्हे मतदार संघातील उर्वरित रस्त्यांच्या कामांसाठी निधी उपलब्ध करून घेण्यासाठी त्यांचा पाठपुरावा सुरु होता. त्यातही त्यांना यश आले असून मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातून मतदार संघातील सहा रस्त्यांची दर्जोन्नती करण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. त्यासोबतच ४१ किलोमीटरच्या या रस्त्यांसाठी सिमेंट काँक्रीटीकरणासाठी ४७ कोटी ५७ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात ◀◀ पान ३ वर

### या रस्त्यांची दर्जोन्नतीसह होणार कामे

**रा.मा. ६४ ते कानडी बदन रस्ता (२.८ किमी) - ३.८८ कोटी रु., रा.मा. ६४ (चिंचोलीमाळी जवळ) ते सारूकवाडी डोका हदगाव लाखा रस्ता (८.५ किमी) - १०.२८ कोटी रु., इजिमा ५४ (चाकरवाडी जवळ) ते दरडवाडी ढाकणवाडी नांदूरघाट रस्ता (११ किमी) - १३.२६ कोटी रु., प्रजिमा १८ (सोनीजवळा जवळ) ते युसुफ वडगाव भालगाव सादोळा बाऊची रस्ता (१३.५ किमी) - १४.५ कोटी रु., प्रजिमा ३९ ते काशिदवाडी रस्ता (२.८ किमी) - ३.४७ कोटी रु., रा.म.मा. ५४८-ड ते सनगाव (२.२ किमी) - २.५८ कोटी रु.. या व्यतिरिक्त रस्ते देखभालीसाठी स्वतंत्रपणे २ कोटी १७ लाखांचा निधी**

# माजलगाव शहरात असणार आता सीसीटिव्ही कॅमेऱ्यांची करडी नजर

## सीसीटिव्ही निगराणी यंत्रणेचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते उद्घाटन



**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरातील वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी आणि विशेषतः घडणाऱ्या गुन्ह्यांना आळा घालता यावा,घडलेल्या गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी पोलिसांना मदत व्हावी या दृष्टीने माजलगाव शहरासाठी सीसीटिव्ही निगराणी या महत्वाकांक्षी उपक्रमाचे उद्घाटन पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते दि २० जुलै शनिवार रोजी दुपारी ३:०० वाजता माजलगाव शहर पोलिस स्टेशन या ठिकाणी संपन्न झाला.याप्रसंगी आमदार प्रकाश सोळंके यांची उपस्थिती होती.

४.९४ कोटी निधी असलेल्या या सीसीटिव्ही निगराणी यंत्रणेत शाळा, महाविद्यालयासह २६ ठिकाणी ११५ कॅमेरे बसवण्यात आले आहेत. रस्त्याने ये-जा करण्याऱ्या प्रत्येक गोष्टींवर करडी नजर इथून पुढे पोलीस प्रशासनाची असेल. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर या मध्ये केला असल्याने पोलीस यंत्रणेचा ताण कमी होणार असून शहरातील वाहतुकीला चांगली शिस्त यामुळे लागेल ही खात्री आहे.एवढच नव्हे तर लहान गुन्ह्यांचे प्रमाण हे कमी होण्यासाठी याची मदत होईल.शहर पोलिस स्टेशन मधूनच प्रत्येक ठिकाणी सूचना देता येईल अशा प्रकारची सुविधा या मध्ये प्रामुख्याने केलेली आहे.आधुनिक तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर आपल्या शहरात होतोय याचा मनस्वी आनंद आहे''

# परळी औष्णिक वीज केंद्र प्रदूषण बाबत नोटीस; जनहित याचिकेची न्यायालयाकडून दखल

**परळी । प्रतिनिधी**

परळी येथील औष्णिक वीज प्रकल्पामुळे होत असलेल्या गंभीर प्रदूषणाविरोधात वडगाव दादहरी ग्रामपंचायतीच्या सरपंचाने दाखल केलेल्या रिट याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने सुनावणी करताना या रिटचा जनहितार्थ निर्णय घेतला आहे. याचिका () आणि १३ ऑगस्ट रोजी परत करण्यायोग्य नोटिस जारी केल्या.

न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती वाय.जी. खोब्रागडे यांचा समावेश असलेल्या हायकोर्टाच्या खंडपीठाने औष्णिक प्रकल्पातून वर्षानुवर्षे निघणाऱ्या फ्लाय ॲश तसेच स्लरीमुळे आजूबाजूच्या शेतजमिनींचे मोठ्या प्रमाणावर पडीक जमिनीत रूपांतर होत असल्याची गंभीर दखल घेतली. पशुधन तसेच मानवी जीवनावर थेट परिणाम होत असल्याने न्यायालयाने राज्य सरकार, महाराष्ट्र स्टेट पॉवर जनरेशन कंपनी लिमिटेड (महागेनको), आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ () यांना नोटीस बजावली.

परळी तालुक्यातील वडगाव दादहरी येथील सरपंच अश्विनी कुक्कर यांनी वकील प्रशांत बर्डे यांच्यामार्फत उच्च न्यायालयात रिट दाखल करून



औष्णिक वीज केंद्रातून निघणाऱ्या फ्लाय ॲश आणि स्लरीमुळे होणाऱ्या प्रदूषणावर तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी केली होती. नंतरचे ७५० मेगावॅट क्षमतेचे राज्यातील कोळसा-आधारित वीज प्रकल्पांपैकी एक आहे.कुक्कर यांनी असा दावा केला की कोळसा हे संयंत्र चालवण्यासाठी वापरले जाणारे प्राथमिक इंधन असल्याने, त्याचे अवशेष सुमारे ३ चौ.कि.मी.च्या परिसरात खुलेआम रचले जातात, ज्यामुळे अनेक किलोमीटरच्या परिघात पर्यावरणीय समस्या निर्माण होतात.

बरडे यांच्या म्हणण्यानुसार, महाजेनको आणि थर्मल प्लांट व्यवस्थापन पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ अंतर्गत दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करत नसल्याचा ग्रामपंचायतीचा मुख्य युक्तिवाद आहे. प्रदूषणामुळे येथील रहिवाशांच्या आरोग्याच्या समस्यांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. आजूबाजूचा परिसर आणि शेतीवरही गंभीर परिणाम झाला आहे, जमिनी आधीच नापीक झाल्या आहेत.

"माणसं आणि पशुधन सारखेच समस्यांना तोंड देत आहेत. फ्लाय ॲशच्या सततच्या वाहतुकीमुळे गावातील रस्त्याचीही दुरवस्था झाली आहे. वीज गरजेची आहेच पण प्रदूषणावर नियंत्रण मिळवणेही गरजेचे आहे. दुर्दैवाने, प्लांट चालवणाऱ्या महाजेनकोने हे केले नाही,'' बर्डे म्हणाले. याचिकेत असेही निदर्शनास आणले आहे की ग्रामस्थांनी केलेल्या तक्रारींमुळे, एमपीसीबीने समस्येची दखल घेतली परंतु आजपर्यंत कोणतेही प्रतिबंधात्मक किंवा उपचारात्मक उपाय सुरू करण्यात अयशस्वी झाले.

हायकोर्टाच्या विभागीय खंडपीठाने नोटीस जारी करताना, विशेषतः राज्य सरकार, एमपीसीबी आणि महाजेनको यांना या समस्येचे निराकरण करण्यासाठी उचललेल्या पावलांवर विशिष्ट उत्तरे दाखल करण्याचे निर्देश दिले.सुनावणीदरम्यान राज्य सरकारतर्फे सरकारी वकील अमरजीत गिरासे, एमपीसीबीतर्फे उत्तम बोंदर आणि महाजेनकोतर्फे राहुल तांबे यांनी बाजू मांडली.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायलयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# अजित पवारांच्या जीआरला सुप्रिया सुळेंचही जीआरनेच उत्तर; बैठकीत दादा-ताई आमनेसामने

पुणे । प्रतिनिधी

पालकमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेली पुणे जिल्हा नियोजन मंडळाची बैठक आज चांगलीच चर्चेत ठरली. कारण, खासदार शरद पवार यांनी थेट या बैठकीला उपस्थिती दर्शवल होती, विशेष म्हणजे त्यांनी बारामतीमधील दूषित पाण्यासंदर्भाने प्रश्नही विचारला. तर, दुसरीकडे खासदार सुप्रिया सुळे आणि अमोल कोल्हे यांनीही अजित पवारांना प्रश्न विचारले होते. मात्र, या दोन्ही खासदारांच्या प्रश्नावरुन अजित पवारांनी थेट जीआर काढूनच नियम दाखवला. त्यावरुन, आता सुप्रिया सुळे आणि अजित पवार यांच्यात शाब्दीक खडाजंगी होत असल्याचं दिसून येत आहे. कारण, अजित पवार यांच्या जीआरला सुप्रिया सुळेंनीही जीआरनेच उत्तर दिलंय. माझ्याकडेही जीआर आहे, त्यात प्रत्येक खासदार-आमदाराला ज्याला आमंत्रित केलेलं आहे, त्यांना बोलण्याचा अधिकार आहे, असा पलटवार सुप्रिया सुळे पालकमंत्र्यांवर केला.



शरद पवारांचा पिंपरी चिंचवडमध्ये विजयी संकल्प मेळावा पार पडतोय. एकेकाळी अजित पवारांचा बालेकिल्ला समजल्या पिंपरी चिंचवडमध्ये शरद पवारांची तोफ धडाडली. मात्र, याच मेळाव्यातून आमदार रोहित पवार आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी थेट अजित पवारांवर हल्लाबोल केला. शरद पवारांचा यंदा ८५वा वाढदिवस आहे. त्यामुळं प्रदेशाध्यक्ष जयंत पाटलांसह आम्ही सर्वांनी एक संकल्प केलाय. आपण ९० जागा लढवू अथवा किती ही जागा लढवू, आपले ८५ आमदार निवडून आलेच पाहिजेत. फक्त विधानसभेतचं नव्हे तर महापालिकेत ही आपले ८५ नगरसेवक निवडून यायलाचं हवेत,असे रोहित पवार यांनी म्हटले. तर, सुप्रिया सुळेंनी जीआरचा दाखल देता अजित पवारांवर प्रतिहल्ला केला.

''आज डीपीडिसी बैठक झाली. आज मी वडिलांकडून आणखी एक गोष्ट शिकले. जेंव्हा पालकमंत्री (अजित पवार ) आले तेंव्हा पवार साहेबांसह सगळे उभे राहिले. जी व्यक्ती पालकमंत्री होती, त्या पदाचा तो मान होता. स्वर्गीय यशवंतराव चव्हाणांचे हे विचार आहेत. याच बैठकीत मी आणि अमोल कोल्हे यांनी प्रश्न उपस्थित केले. त्यावेळी पालकमंत्री यांनी एक कागद काढला आणि त्यांनी खासदार-आमदारांबाबत मुद्दा मांडला. या बैठकीत फक्त आमंत्रित केलेलं आहे. तुम्हाला बोलण्याचा अधिकार नाही. मात्र माझ्याकडे एक जीआर आहे, त्यात प्रत्येक खासदार-आमदाराला ज्याला आमंत्रित केलेलं आहे, त्यांना बोलण्याचा अधिकार आहे. मात्र, आम्हाला मत देण्याचा अधिकार नाही. लोकशाहीने दिलेल्या अधिकाराचा वापर करून आम्ही निधीबाबत प्रश्न उपस्थित केलं. मात्र, या सशक्त लोकशाहीत आमचा आवाज दाबण्याचं काम सुरू आहे. या हुकूमशाही विरोधात आपल्याला आवाज उठवायचा आहे,'', असा पलटवार सुप्रिया सुळे यांनी केलाय.

अजित पवारांमध्ये मी पणा - रोहित पवार

शहराचा विकास हा स्थानिकांनी केला. इथल्या स्थानिकांचे मन खूप मोठे आहे. इथल्या स्थानिकांनी राज्याच्या कानाकोपऱ्यातुन आलेल्या प्रत्येकाला स्वीकारले. त्यामुळं तुम्ही या शहराचा विकास केला. आता काहीजण स्वतः क्रेडिट घेतात. जसं वाडपी असतो त्याला वाटतं आपल्यामुळंच सर्वांची पोटं भरतात, तोच सगळं श्रेय लाटायला बघतो. हे मी पणातून होतंय. हा मी पणा भाजपमध्ये ठासून भरला आहे. तेच विचार काहींच्यामध्ये दिसतायत, असे म्हणत रोहित पवारांनी नाव न घेता अजित पवारांवर जोरदार हल्लाबोल केला. तसेच, सगळे जागे आहात ना? मग माझ्या मागे घोषणा द्या. पवार साहेब तुम आगे बढो, आवाज जरा कमी आहे. आता असा आवाज घुमवा की उद्या कोणाची तरी सभा (अजित पवार) होणार आहे, त्या सभेत ही फक्त अन फक्त पवार साहेबांचा आवाज घुमायला हवा, असेही रोहित पवार यांनी म्हटले.

# परदेश शिक्षण शिष्यवृत्तीच्या जाचक अटी अखेर रद्द



पुणे । प्रतिनिधी

## सम्यक विद्यार्थी आंदोलनाच्या लढ्याला, पाठपुराव्याला यश ! - इंजि. अक्षय गोटेगावकर

महाराष्ट्र शासनाकडून राबवली जाणारी राजर्षी छत्रपती शाहू महाराज परदेश शिष्यवृत्ती योजना पारदर्शी, शाहू महाराज परदेश शिक्षण शिष्यवृत्ती योजना प्रभावीपनणे राबवण्यात राज्य शासन, प्रशासन सपशेल नापास झाल्याचे सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे पुणे जिल्हा निरीक्षक तसेच ज्ञानमाता माहिती अधिकार कार्यकर्ते नागरिक समूह महाराष्ट्र राज्य प्रचार व प्रसारक अक्षय गोटेगावकर त्यांनी अधोरेखित केले होते. परदेश शिक्षण शिष्यवृत्ती रद्द केले नाही तर राज्यभर तीव्र निदर्शनासह आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी सामाजिक न्याय विभागाला दिला होता. त्याचा परिणाम म्हणून अक्षय गोटेगावकर यांच्या ईशाऱ्याची शासनाने दखल घेत प्रदेश शिक्षण शिष्यवृत्तीच्या जाचक अटी रद्द केले आहेत. वंचित बहुजन आघाडी व सम्यक विद्यार्थी आंदोलनाच्या लढ्याला यश आले आहे. सम्यक विद्यार्थी आंदोलनामुळे परदेशी शिष्यवृत्ती मिळणार.

विद्यार्थ्यांना दिलासा! परदेशी शिष्यवृत्तीतील जाचक अटी अखेर रद्द

पदवीमध्ये ५५ टक्के गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्याला परदेशी शिष्यवृत्तीचा लाभ घेता येणार परदेशी विद्यापीठाचे सर्व शुल्क सरकार भरणार

एका कुटुंबातील दोन विद्यार्थ्यांना लाभ मिळणार ८ लाखांची उत्पन्न मर्यादा कायम असल्याने लढा सुरुच राहणार

वंचित बहुजन आघाडी आणि सम्यक आंदोलनाने घेतला पुढाकार मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या परदेशी शिक्षणाचा मार्ग झाला मोकळा त्यामुळे परदेश शिक्षण शिष्यवृत्तीचे अर्जदार विद्यार्थ्यांकडून सम्यक विद्यार्थी आंदोलन सल्लागार समिती महाराष्ट्र राज्य, प्रा. अंजलीताई आंबेडकर, डॉ. अरुण सावंत महेश भारतीय सर यांचे आभार व्यक्त करत आहेत.

# दुसऱ्या समन्सनंतरही पूजा खेडकर पुणे पोलिसांसमोर गैरहजर

पुणे । प्रतिनिधी

प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांना जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांच्याविरुद्ध छळवणुकीची तक्रार केल्याप्रकरणी जबाब नोंदविण्यासाठी पुणे पोलिसांनी दोनवेळा समन्स बजावले. परंतु त्या शनिवारी (ता. २०) जबाब नोंदविण्यासाठी हजर राहिल्या नाहीत. दरम्यान, पोलिसांनी पुन्हा खेडकर यांना जबाब नोंदविण्यासाठी आज तिसऱ्यांदा समन्स बजावले आहे.

पूजा खेडकर पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी म्हणून कार्यरत होत्या. या कालावधीत जिल्हाधिकारी दिवसे यांनी छळ केल्याची तक्रार खेडकर यांनी वाशीम पोलिसांकडे केली होती. वाशीम पोलिसांनी ही तक्रार पुणे पोलिसांकडे सोपवली. याबाबत



पुणे पोलिसांनी खेडकर यांना जबाब नोंदविण्यासाठी दोनवेळा समन्स बजावले. त्यावर खेडकर यांनी दोन दिवसांची वेळ मागितली होती. त्यामुळे त्या शनिवारी पुण्यात येणे अपेक्षित होते. मात्र, त्या आल्या नाहीत, असे वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

दरम्यान, पूजा खेडकर यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाकडे दृष्टिदोष प्रमाणपत्र आणि उत्पन्नाचा दाखला सादर केला होता. त्यात स्वाक्षरी, पत्ता बदलून फसवणूक केल्याचे आयोगाच्या चौकशीत समोर आले आहे. याबाबत त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात येणार आहे. त्यानंतर पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे आयोगाकडून स्पष्ट करण्यात आले.पुणे पोलिसांनी पूजा खेडकर यांना दोन वेळा समन्स बजावूनही त्या हजर राहिलेल्या नाहीत. त्यांच्या निवासस्थानीही त्या नव्हत्या. मोबाईल बंद असल्याने त्यांच्याशी संपर्क झालेला नाही. त्यामुळे त्यांना तिसऱ्यांदा इ-मेलद्वारे समन्स पाठविले आहे. हजर न राहिल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

- शैलेश बलकवडे, अतिरिक्त पोलिस आयुक्त, गुन्हे शाखा.

# दिलीप वळसेंची कन्या तुतारीच्या चिन्हावर विधानसभा निवडणूक लढण्याची चर्चा, शरद पवार म्हणाले....

पुणे । प्रतिनिधी

मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या कन्या ॲड. पूर्वा वळसे पाटील यांचा गेल्या काही दिवसांपासून आपल्या मतदारसंघात वावर वाढला आहे. यामुळे पूर्वा वळसे पाटील या विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याचे संकेत आहेत. मात्र अजित पवार गटात असलेल्या दिलीप वळसे पाटलांची कन्या शरद पवारांच्या राष्ट्रवादीतून विधानसभा निवडणूक लढवणार, अशी चर्चा सध्या राजकीय वर्तुळात रंगली आहे. याबाबत शरद पवारांनी महत्वाचे वक्तव्य केले आहे.



दिलीप वळसेंची कन्या शरद पवार गटाकडून निवडणुकीच्या रिंगणात?

दिलीप वळसेंची कन्या शरद पवार गटाकडून विधानसभा लढण्यास इच्छुक आहेत का? असा प्रश्न विचारला असता शरद पवार म्हणाले की, आमच्या बाजूनं आमचा निर्णय आमचे स्थानिक नेते घेतील. या पलीकडे आणखी कोणाचं नाव घ्यायची गरज नाही, असे वक्तव्य त्यांनी केले आहे.

अतुल बेनके कोण आहेत?

तर अतुल बेनके यांनी आज शरद पवारांची भेट घेतली. याबाबत शरद पवार म्हणाले की, हे अतुल बेनके कोण आहेत? एखाद्या पक्षाच्या अध्यक्षाने यांना उत्तर द्यावं, इतका महत्वाचा माणूस आहे का हा? तुम्ही कोणाबद्दल विचारायला हवं अन् कोणाला महत्व द्यायला हवं, हे ठरवायला हवं, असे त्यांनी म्हटले.

शरद पवारांचा दिलीप वळसे पाटलांवर निशाणा

दिलीप वळसे पाटील हे आपल्या मतदारसंघात विकास करायला कमी पडले का? असे विचारले असता शरद पवार म्हणाले की, दिलीप वळसेंनी त्यांच्या मतदारसंघातले प्रश्न सोडवले नाहीत का? हे त्यांना विचारा, मुळात ते किती वर्षे सत्तेत आहेत. ३५ वर्षे आमदार, त्यापैकी २५ वर्षे मंत्री आहेत. आता ज्यांना २५ वर्षात विकास करता आला नाही ते आता काहीतरी सांगतात. मुळात हा संधीसाधूपणा आहे. अनेकांना अनेक वर्षे संधी देऊन ही त्यांना कामं करता आलेली नाहीत. जनतेला न्याय देता आलेलं नाही, याला उत्तर आता शोधावं लागेल. यासाठी राज्याची सत्ता हातात घ्यावी लागेल.

जनतेचा कल बदललाय

अमित शाह यांच्या महाराष्ट्र दौऱ्याबाबत शरद पवार म्हणाले की, महाराष्ट्राच्या जनतेने त्यांना त्यांची जागा दाखवली आहे. आता बघा पाच वर्षांपूर्वी काँग्रेसचा एक आणि राष्ट्रवादीचे चार खासदार निवडून आले. यावेळी महाराष्ट्राच्या जनतेने ४८ पैकी ३१ खासदार निवडून दिलेत. याचा अर्थ जनतेचा कल बदललेला आहे. आता जनतेने आमच्याकडे अपेक्षा ठेवल्या आहेत, असे त्यांनी म्हटले.

आम्हाला राज्याला स्थिर सरकार द्यायचंय

विधानसभा निवडणुकीसाठी मविआच्या जागावाटपाबाबत शरद पवारांना विचारले असता ते म्हणाले की, मविआचे तिन्ही पक्ष एकत्र बसून निर्णय घेतील. हीच जागा द्या किंवा तीच जागा द्या, असा आग्रह आम्ही करणार नाही. आम्हाला राज्याला स्थिर सरकार द्यायचं आहे, हे आमचं मुख्य उद्दिष्ट आहे, असे स्पष्टीकरण शरद पवारांनी दिले आहे.

शहाण्या माणसांनी याची नोंद घ्यावी

स्वंयसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी काही लोक आधी सुपरमॅन (महापुरुष), त्यानंतर पूजनीय आणि पूजनीयनंतर देव बनू पाहत आहेत, असे वक्तव्य केले होते. यावर शरद पवार म्हणाले की, आता मला कल्पना नाही, ते कोणाबद्दल बोलले असावेत. आता देव बनायला कोणीतरी निघाले होते. त्यावर भाजप आणि आरएसएसचे लोक वक्तव्य करायला लागले. शहाण्या माणसांनी याची नोंद घ्यावी, असे त्यांनी सांगितले.

# धक्कादायक! 3 वर्षांपासून बेपत्ता, पण मुख्यमंत्र्यांच्या जाहिरातीत झळकला; वृद्धाच्या मुलाने घेतली पोलिसात धाव

मुंबई । प्रतिनिधी

राज्य सरकारकडून सध्या योजनांची चलती असून लाडकी बहीण, लाडका भाऊ आणि वयोवृद्धांसाठीही योजना जाहीर करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये, मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. ६० वर्षांवरील नागरिकांना योजनेचा लाभ घेता येणार असून देशभरातील ६६ तीर्थक्षेत्रांसाठी योजना लागू करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ घेणाऱ्या प्रवाशांना ३० हजारांपर्यंत अनुदान मिळणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजने'ची घोषणा केली आहे. आता, या योजनेच्या संदर्भाने केलेल्या एका जाहिरातीवरुन सरकावर टीका होत आहे. कारण, तीर्थक्षेत्र योजनेच्या जाहिरातीवर वापरण्यात आलेल्या व्यक्तीचा फोटो पाहता, ती व्यक्ती ३ वर्षांपासून घरातून बेपत्ता असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. त्यावरुन, शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी मुख्यमंत्र्यांवर टीका केलीय.

गेले तीन वर्षांपासून बेपत्ता असलेल्या व्यक्तीचा फोटो आता ज्येष्ठांना घडवणार धार्मिक स्थळाचे दर्शन या मुख्यमंत्र्यांच्या जाहिरात फलकावर दिसल्याने त्या व्यक्तीच्या कुटुंबीयांना आश्चर्याचा धक्का बसला आहे. पुणे जिल्ह्याच्या शिरूर तालुक्यातील वरूडे येथील ज्ञानेश्वर विष्णू तांबे हे गेले तीन वर्षापासून आपल्या कुटुंबापासून बेपत्ता होते, त्यांचा कुटुंबाने सर्वत्र शोध देखील




घेतला. परंतु, तांबे कुटुंबीयांना ज्ञानेश्वर तांबे आढळून आले नाहीत,अखेरीस तीन वर्षानंतर मुख्यमंत्र्यांच्या आता ज्येष्ठांना घडवणार धार्मिक स्थळाचे दर्शन या जाहिरात फलकावर ज्ञानेश्वर तांबे यांचा फोटो दिसल्याने कुटुंबीयांस धक्काच बसला आहे. याबाबत ज्ञानेश्वर तांबे यांचे चिरंजीव भरत ज्ञानेश्वर तांबे यांनी सांगितले की, आमचे वडील गेले तीन वर्षापासून हरवले होते आम्ही त्यांचा सर्वत्र शोध घेत होतो. परंतु ते सापडत नव्हते, आता त्यांचा फोटो मुख्यमंत्र्यांच्या जाहिरातीत दिसून आल्याने आम्हाला आश्चर्याचा धक्का बसला आहे, मुख्यमंत्री ज्याप्रमाणे जेष्ठ नागरिकांना धार्मिक स्थळाचे दर्शन घडवणार आहे, त्याचप्रमाणे आम्हाला आमच्या वडिलांचे दर्शन घडून द्यावे ही विनंतीही तांबे यांच्या पुत्राने केली आहे.

सुषमा अंधारेंची मुख्यमंत्र्यांवर टीका


मुख्यमंत्र्यांनी कितीही कंठशोष करुन सांगितलं तरीही हे सरकार सर्वसामान्य नसल्याचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या कृतीतून दिसून येते. कारण, हे सरकार जाहिरातबाजी करणारं सरकार आहे, चाराण्याची कोंबडी आणि बाराण्याचा मसाला असं हे सरकार आहे. वारकऱ्यांच्या संबंधाने जी पर्यटन योजना सरकारने जाहीर केली, त्यातही स्वत:चीच पाठ थोटपून घेतली जात असल्याचं सुषमा अंधारे यांनी म्हटले. यावेळी, त्यांनी जाहिरातीवर लावण्यात आलेल्या फोटोचाही संदर्भ दिली. पुण्याच्या शिरुरमधील ज्ञानेश्वर तांबे नामक व्यक्तीचा फोटो या जाहिरातीवर लावण्यात आला आहे. मात्र, ते बेपत्ता असून तांबे कुटुंबीय गेल्या ३ वर्षांपासून शोधत होते. जेव्हा ज्ञानेश्वार तांबे यांचे चिरंजीव भरत तांबे यांनी तक्रार केली, तेव्हा हे सरकार स्वत:च्या जाहिरातीसाठी लोकांच्या भावनांशी खेळते हे पुन्हा एकदा सिद्ध झालं, असेही अंधारे यांनी म्हटले.

# मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर भीषण अपघात, कोंबड्यांनी भरलेला टेम्पो ट्रकवर आदळला, गाडीचा चेंदामेंदा होऊन चालकाचा मृत्यू

मुंबई । प्रतिनिधी

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर शुक्रवारी रात्री भीषण अपघात झाल्याची माहिती समोर आली आहे. या अपघातामध्ये एकाचा मृत्यू झाला आहे. शुक्रवारी रात्री मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर कोंबड्यांची वाहतूक करणारा टेम्पो मागच्या बाजूने एका ट्रकवर जाऊन आदळला. ही धडक इतकी भीषण होती की, टेम्पोच्या चालकाचा जागीच मृत्यू झाला. मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर खालापूर टोलनाक्याजवळ हा अपघात झाला. मुंबईच्या दिशेने येणाऱ्या मार्गिकेवर ट्रक आणि टेम्पोची धडक झाली.

अपघातग्रस्त ट्रकमधून साखरेची वाहतूक केली जात होती. या ट्रकवर मागच्या



बाजूने कोंबड्यांनी भरलेला टेम्पो जोरात येऊन धडकला. ही धडक इतकी जोरदार होती की, टेम्पोच्या पुढील भागाचा पूर्णपणे चेंदामेंदा झाला आहे. या जोरदार धडकेमुळे ट्रक आणि टेम्पोला आग लागली. त्यामुळे ट्रकचा मागील भाग आणि टेम्पोचा पुढील भाग पूर्णपणे जळून खाक झाला. त्यामुळे टेम्पो चालकाचा जागीच मृत्यू झाला. या अपघातात एक जण जखमी झाला असून त्याला उपचारासाठी एमजीएम हॉस्पिटल पनवेल येथे दाखल केले आहे.

दोन्ही गाड्यांची धडक झाल्यानंतर कोंबड्यांच्या टेम्पोची पुढची बाजू पूर्णपणे चेपली गेली. त्यामुळे टेम्पो चालकाचा मृतदेह आतमध्ये अडकून पडला होता. याशिवाय, टेम्पोला अपघातानंतर आग लागल्याने मदतकार्य करताना अडचणींचा सामना करावा लागला. अखेर आग विझवल्यानंतर बचाव पथकातील कर्मचाऱ्यांनी टेम्पोचा पत्रा कापून चालकाला बाहेर काढले. मात्र, तोपर्यंत त्याचा मृत्यू झाला होता. चेंदामेंदा झालेल्या टेम्पोची अवस्था पाहून या अपघाताच्या भीषणतेची कल्पना येऊ शकते. जोरदार धडकेमुळे टेम्पोमधील काही कोंबड्याही दगावल्या. काहीवेळापूर्वी हा टेम्पो रस्त्यातून दूर करण्यात आला आहे. या भागात रात्रीपासून मुसळधार पाऊस सुरु असल्याने बचावपथकातील कर्मचाऱ्यांना अडचणीचा सामना करावा लागला.

# विधानसभा निवडणुक जिंकण्याचा पवारांचा 'प्लॅन' ठरला, कार्यकर्त्यांना दिले हे निर्देश!

पुणे । प्रतिनिधी

भारतीय जनता पक्षाच्या सरकारने सत्तेचा वापर ठराविक लोकांच्या फायद्यासाठी व काही जणांना



जाणीवपूर्वक त्रास देण्यासाठी केला. शेतात घाम गाळणार्या शेतकऱ्यांच्या विरोधात काम केले.

त्यामुळे लोकसभा निवडणुकीत राज्यातील जनतेने व शेतकऱ्यांनी त्यांना त्यांची जागा दाखावून दिली आहे. विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडी सत्ता हातात घेईल. असा विश्वास जेष्ठ नेते शरद पवार यांनी व्यक्त केला.

तांबडेमळा-मंचर (ता.आंबेगाव) येथे शनिवारी (ता.२०) राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पक्षाच्यावतीने आयोजित केलेल्या जनता दरबारात पवार बोलत होते.यावेळी पुणे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पक्षाचे अध्यक्ष जगन्नाथ शेवाळे, खासदार डॉ.अमोल कोल्हे, भीमाशंकर कारखान्याचे माजी अध्यक्ष देवदत्त निकम, शेखर पाचुंदकर बाळासाहेब बाणखेले, सदाशिव थिटे उपस्थित होते. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पवार यांनी जनता दरबाराच्या माध्यमातून आंबेगाव-शिरूर मतदारसंघातील १६ पंचायत समिती गणातील प्रमुख कार्यकर्त्यांशी संवाद साधून निवडणूक प्रचाराची पेरणी सुरु केली.

पवार म्हणाले शेतकरी व तरुणांचे रोजगाराचे प्रश्न प्रश्न सोडवू. कार्यकर्त्यांनी घरोघरी जाऊन मतदारांना जागृत करण्याचे काम करावे.लोकसभा निवडणुकीप्रमाणेच सर्वांची साथ भक्कम राहू द्या.जुन्नर, खेड, आंबेगाव, शिरूर तालुक्यासह राज्यातील प्रत्येक जागा जिंकायच्या आहेत. देशात महाराष्ट्र राज्य प्रथम क्रमांकाचे आपल्या सर्वांना करायचा आहे. त्या दृष्टीने कामाला लागा.

## कल्याणीनगरमध्ये अजून कार अपघात, अल्पवयीन विद्यार्थ्याचा मृत्यू

पुणे । प्रतिनिधी

आज सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास येरवडा येथील कल्याणीनगर भागातील मेरी गोल्ड सोसायटीसमोर कार आणि सायकल यांच्या झालेल्या धडकेत शाळेला सायकलवरून जाणारा मुलगा शाश्वत राम बोगाडे (वय १५ वर्षे, राहणार - कुमार कृती सोसायटी, कल्याणनगर) गंभीर जखमी झाला. त्याला जवळच्या खाजगी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. मात्र उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. हुंडाई मोटरकारचालक रविकांत रामदिन गौर( वय ३७ वर्षे, राहणार - रोहन निगम अपार्टमेंट, विमाननगर) यास ताब्यात घेण्यात आल्याची माहिती येरवडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र शेळके यांनी दिली. वैद्यकीय तपासणीत मद्यप्राशन केलेले नाही, असा अहवाल प्राप्त झालेला आहे. घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज चेक करण्यात आलेले असून अधिक तपास चालू असल्याचे पोलिसांनी सांगितले.